gdmƒ Ý`m`mb`mÀ`m
{ejU {df`H$ {ZH$mbmM Jmfdmam

# Summary of Recent Supreme Court Judgements on Education


**Retd. Prin. S.W. Gokhale**
Campus Co-Ordinator
Vidya Prasarak Mandal, Thane



**Vidya Prasarak Mandal**
Dr. Bedekar Vidya Mandir,
Naupada, Thane - 400 602


*For Private Circulation Only*

*खाजगी वितरणासाठी*

**डॉ. वा.ना. बेडेकर द्वितीय स्मृतिदिन**
**शुक्रवार दि. १४ एप्रिल २००६**


*Published by*
**Vidya Prasarak Mandal**
Dr. Bedekar Vidya Mandir,
Vishnu Nagar, Naupada, Thane 400 602.
Tel. : 2542 6270
Email : vpmt@vsnl.net
www.vpmthane.org

*Printed by*
**Perfect Prints**
22/23, Jyoti Industrial Estate
Nooribaba Darga Road,
Thane - 400 601, INDIA
Tel. : 2534 1291 / 2541 3546
Email : perfectprints@vsnl.net

# प्रस्तावना

सर्वोच्च न्यायालयानी शिक्षणासंदर्भात अलीकडील काळात दिलेल्या काही महत्त्वाच्या निवाड्यांचा गोषवारा पुस्तकरूपाने आपल्याला सादर करताना आनंद होत आहे. बहुतेक वेळेला अशा निवाड्यांचा संदर्भातील बातम्या एवढाच आपला यासंबंधातील माहितीचा स्रोत असतो. अशा वृत्तपत्रामधील बातम्यांमध्ये न्यायालयाच्या सुस्पष्ट मतापेक्षा या निवाड्यांवर, बहुतांशी राजकीय मंडळींचे मतप्रदर्शनच अधिक असते. शिवाय उच्चतम न्यायालयांतील सर्व निवाड्यांची भाषा ही इंग्रजी असते. त्यांची मांडणीही क्लिष्ट असते. म्हणूनच अशा महत्त्वाच्या निर्णयांचा गोषवारा आपल्या मातृभाषेमध्यें मिळणं हे अत्यावश्यक ठरते. या पुस्तकांमध्ये इंग्रजी आणि मराठी या दोन्हीही भाषेमध्यें हे गोषवारे देण्यांत आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयांनी दिलेले निर्णय हे खरं म्हणजे कुठल्याही कायदेशीर विवादातील अंतिम मार्गदर्शन असते. पै फांऊडेशनचा निर्णय हा तर ११ न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिलेला आहे. या नंतरही दिले गेलेले बहुतांशी निर्णय हे पै फांऊडेशनच्या निर्णयांत काही संदिग्धता राहिली असेल, तर ती दूर करण्यापुरतेच मर्यादित आहेत. हे निर्णय बहुतांशी शिक्षणसंस्थांच्या मग त्या अनुदानित असोत वा नसोत, स्वायत्ततेशी निगडीत आहेत. प्रवेश, शुल्क आणि देणग्या या सर्वच बाबींचा यामध्यें उहापोह करण्यांत आला आहे.

आर्थिक क्षेत्रामध्ये १९९१ पासून नवीन उदार धोरण स्विकारण्यात आले. सरकारीकरणामुळें निर्माण झालेली परवाना पद्धत आणि त्यातून निर्माण झालेला प्रचंड भ्रष्टाचार या दुष्टचक्रातून या उद्योग धंद्यांची मोठ्या प्रमाणावर सुटका करण्यांत आली. हा बदल सैध्दांतिक ही होता. बँकांपासून सर्वच उद्योगधंद्यावर सरकारी अंकुश आणूनही त्यामध्ये काहीच गुणात्मक किंवा आर्थिक बदल होत नव्हता. राजकारणी, नोकरशहा आणि काही अपवाद वगळता बहुसंख्य लोकप्रतिनिधी यांची मात्र या परवाना राज्यांत भरभराट होत होती. या परवाना पद्धतीचा विळखा सुटल्यावर अवध्या १५ वर्षात उद्योगधंद्यांनी केलेली प्रगती, यामुळें उंचावलेला सर्वसामान्य माणसाचा आर्थिक स्तर हीच या उदार धोरणाच्या यशाची पावती आहे.



दुर्दैवाने जे स्वातंत्र्य उद्योगक्षेत्राला मिळाले ते स्वातंत्र्य आजही शैक्षणिक क्षेत्राला मिळू शकत नाही. याला सरकार एवढीच लोकांची मानसिकताही कारणीभूत आहे. जगांत फुकट काहीच मिळत नाही. शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी या सगळ्यांचाच दर्जा पगारांपासून सर्वच बाबींकरता औद्योगिक कर्मचाऱ्यांच्या दर्जासमानच धरला गेला आहे. यामधें अयोग्यही काही नाही. प्रश्न एवढाच आहे की औद्योगिक क्षेत्र हे आपल्या मालाच्या किंमती, तो माल निर्माण करण्याकरता आलेला सर्व खर्च आणि नफा धरुनच ठरवतात. याला कोणी नफाखोरगिरी म्हणत नाहीत. यामधे अवास्तव नफा मिळू नये म्हणून उद्योग धंद्यामधें स्पर्धा असावी लागते. अशा स्पर्धांमुळेच आजचा विमानप्रवास, मोटारी, दूरध्वनी, भ्रमणध्वनी यांची उपलब्धताच मुबलक झाली आहे, एवढेच नाही तर सर्वसामान्य माणसालाही परवडतील अशा किंमतीत या वस्तू आणि सेवा मिळू लागल्या आहेत. हे उद्योग जेंव्हा सरकारच्या ताब्यांत होते तेंव्हा त्यांची दुर्भिक्षता आणि सामान्य माणसाला होणाऱ्या यातना आजही विसरणे कठीण आहे. आजच्या शिक्षणक्षेत्रातील गोंधळ हा सुद्धा सरकारी नियंत्रण आणि हस्तक्षेपामुळेच आहे.

आपण अनुदान देतो म्हणजे फार मोठे उपकार करतो अशी सरकारची ठाम भूमिका दिसते. शिवाय हे अनुदान म्हणजे सुद्धा बुहतांशी शिक्षकांच्या पगारापुरतेच सीमित असते. इतर विकासाचा त्यामधे जवळजवळ काहीच विचार केलेला नसतो. गेले काही वर्षे तर पगारा व्यतिरिक्त असेलेले अनुदानही सरकारने देणे बंद केले आहे. पगाराचे अनुदानही दरमहिन्याला मिळेलच अशी खात्री नाही. उच्चतम न्यायालयाच्या निर्णयानी या सगळ्या मानसिकतेवर आघात केला आहे. सरकारची इच्छा असेल तर सर्वांनाच शिक्षण फुकट देण्यास कोणाचाच आक्षेप असणार नाही. पण दुर्दैवाने दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे असलेले हे सरकार सर्वांना फुकट शिक्षण देऊच शकत नाही. गेल्या काही वर्षात सरकारची मदत न घेता, फी आणि देणग्यांच्या माध्यमातून शिक्षण देणाऱ्या स्वायत्तसंस्था निर्माण झाल्या आहेत. या संस्थांना सरकारी मदत नसल्यामुळे साहजिकच अशा संस्थांना जास्त फी आकारावी लागते. अशा संस्थांची संख्या वाढवून स्पर्धा निर्माण केली तरच यामधल्या नफेखोरीला आळा बसू शकतो, अवास्तव नियंत्रणे घालून नाही. आजच्या अनुदानित कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयांचे शुल्क हे हास्यास्पद आहे. यामुळे चांगल्या शिक्षणसंस्था निर्माण होतील ही गोष्ट अशक्य आहे. ज्यांना खरोखरच आपल्या आर्थिक परिस्थितीमुळें शिक्षण घेणे परवडत नाही त्यांना मदत करणे हे योग्यच आहे. पण ज्यांची आर्थिक

क्षमता चांगली आहे अशांनाही या सवलती देणं आणि समाजानेही अशा सवलतींची अपेक्षा धरणे, हे चूक आहे. थोडक्यांत, समाजानेही सवलतग्रस्त न बनता शिक्षणावरच्या खर्चाचे 'वास्तव' स्विकारायला हवे. शिक्षणाचा खर्च हा फक्त शिक्षकांच्या पगारापुरता मर्यादित नसतो. शिक्षण हे जर खरोखरच काळाच्या बदलत्या गरजांशी, तंत्रज्ञानाशी सुसंगत ठेवायचे असेल तर त्याकरता निर्माण करायला लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा खर्चही आकाराव्या लागणाऱ्या शुल्कामधें अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

सरकारची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नियंत्रणे जेवढी वाढतील, तेवढा शिक्षण क्षेत्रात गोंधळ वाढणार आहे. राजकारणी आणि नोकरशहा यांच्या सत्तेच्या लालसे मध्येच या नियंत्रणाचा उगम आहे. त्याचा शिक्षणाचा दर्जा सुधारण्याशी किंवा समाजातल्या सर्वांना माफक किंमतीत शिक्षण मिळावे याच्याशी काडीचाही संबंध नाही. आजही सरकारच्या ताब्यात अनेक शिक्षण संस्था आहेत. सर्व आर्थिक तरतुदी असूनही बहुतांशी त्यांचा दर्जा सुमार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या संस्था आपल्या चांगल्या दर्जा करता प्रसिद्ध होत्या त्यांचे आज मातेरे झाल आहे. सरकारनी आपल्या नियंत्रणात असलेल्या शाळा, महाविद्यालये, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जा सुधारून इतर सरकारी अनुदान नसलेल्या संस्थांशी स्पर्धा करावी. स्वतःही करणार नाही, नी तुम्हालाही करू देणार नाही ही भूमिका बदलायला हवी. सर्वोच्च न्यायालयानी या सर्वच बार्बीचा सखोल विचार करुन आपले निर्णय दिले आहेत.

आपल्यापर्यंत हे निर्णय पोचवणे हाच या पुस्तकाचा हेतू आहे.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. स.वा. गोखले यांनी ही जबाबदारी घेऊन हा गोषवारा तयार केला म्हणूनच तो पुस्तकरूपांने आपल्यापुढे ठेवणे आम्हांला शक्य झाले. आम्ही त्यांचे शतशः ऋणी आहोत.

आपल्या या पुस्तकावरील प्रतिक्रिया ऐकण्यास आम्ही उत्सुक आहोत.

**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष,
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.

डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
गणपत्र : vbedekar@vsnl.com
vpmt@vsnl.net
संकेतस्थळ : http://www.vpmthane.org

# भूमिका

सध्याच्या काळात विशेषत: नवीन आर्थिक धोरणोत्तर पंधरा वर्षात शिक्षण क्षेत्रातील अनेक बाबींवर विचार मंथन, वादविवाद सर्वच पातळ्यांवर चालू असलेले आढळतात. ह्यात प्रामुख्याने शिक्षण पद्धतीमधील सुधारणा, खाजगी शिक्षण संस्थांचा कारभार, प्रचलित अभ्यासक्रमाची व्यावहारिकता, शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी ठरवणे, इत्यादि विषयांचा समावेश होतो. राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेतील शिक्षणाचे केंद्रीय स्थान लक्षात घेतल्यास शिक्षण क्षेत्रातील विविध समस्यांवर आणि वादांवर विस्तृत चर्चा होणे आवश्यक आहे. पण हे लक्षात घ्यावयास हवे की चर्चा, परिसंवाद, वादविवाद अंतिम उद्दिष्ट नसून केवळ साधने आहेत. युवा पिढीत कौशल्य आणि गुणवत्ता निर्माण करून त्यांचा विकास करण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन व्हायचे असेल तर शिक्षण क्षेत्रातील समस्यांवर कायमस्वरूपी उपाय अंमलात आणावयास हवेत. ह्यातून पुढील दशकांत भारताला जागतिक महासत्ता बनवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकेल. राजकारणी, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ इत्यादींच्या बरोबर शिक्षण क्षेत्रातील प्रमुख घटकांचा म्हणजे, विद्यार्थी, शिक्षक, पालक, संस्थाचालक, शासन ह्या सर्वांचा ह्यात सक्रीय सहभाग हवा.

हे थोड्या वेगळ्या स्वरूपाचे पुस्तक म्हणजे, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ह्या पूर्व प्राथमिक ते संशोधनापर्यंत दर्जेदार शिक्षण विविध विद्याशाखांमध्ये देणाऱ्या लोकमान्य शिक्षण संस्थेचा, संबंधित घटकांमध्ये सुसंवाद प्रस्थापित करण्याचा एक नम्र प्रयत्न आहे. शिक्षण क्षेत्रातील सर्वांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर अशा संवादातून व परस्पर विचारमंथनातून योग्य तो उपाय सापडून सर्वांचेच हित होईल असा आम्हाला विश्वास आहे.

अलिकडील काळात शिक्षण क्षेत्रातील तीन महत्त्वाच्या खटल्यांमध्ये, म्हणजे पै फाऊंडेशन वि. कर्नाटक राज्य ( ऑक्टोबर २००२) ब्राह्मो समाज वि.प. बंगाल (मे २००४) आणि पी. के. इनामदार वि. महाराष्ट्र राज्य (ऑगस्ट २००५), सर्वोच्च



न्यायालयाच्या निकालपत्रांचा स्थूल आढावा ह्या पुस्तकात घेतला आहे. ह्या व्यतिरिक्त उन्नीकृष्णन् वि. आंध्रप्रदेश (१९९३) सेंट स्टीफन्स कॉलेज वि. दिल्ली विद्यापीठ (१९९२) केरला एज्यूकेशन बिल (१९५७) इस्लामिक अॅकेडेमी (२००३) असे इतरही अनेक खटले सुप्रीम कोर्टात सुनावणीसाठी आलेले होते. जागेअभावी ह्या सर्वांचा अंतर्भाव करता आला नाही म्हणून केवळ तीन प्रातिनिधीक स्वरूपाच्या अलिकडील खटल्यांचा अंतर्भाव केला आहे. ह्या सर्व खटल्यामध्ये, घटनात्मक तरतूदी, खाजगी शिक्षण संस्थांची स्वायत्तता, शासनाची भूमिका इत्यादि विविध बाबींचे अभ्यासपूर्ण आणि सखोल विवेचन वाद आणि प्रतिवादातून अनुभवी, ज्येष्ठ आणि ज्ञानी वकीलांनी केलेले आढळून येते. माननीय वकील महोदयांच्या ह्या विवेचनाच्या सहाय्याने सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती आणि इतर ज्येष्ठ न्यायाधीशांनी अधिकारपूर्ण आणि मार्गदर्शक स्वरूपाचे निकालपत्र दिले आहे. ह्या निकालपत्रातून शिक्षण क्षेत्रातील विविध वादांचे सखोल आणि मौलिक स्पष्टीकरण प्राप्त होते. एका बाजूने शासनाची सत्ता आणि अधिकार ह्यावर प्रकाश टाकताना न्यायपीठांनी खाजगी शिक्षण संस्थांचे घटनात्मक हक्क, ह्यांचे अधिकार आणि मर्यादा इत्यादींचा आढावा घेतला आहे.

बहुतेक सर्व दाव्यांमध्ये न्यायालयांनी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने वाजवी असे नियम आणि बंधने ह्याबाबतीत सरकारला पाठींबा व्यक्त केला असला तरी असे कायदे खाजगी शिक्षण संस्थांच्या घटनात्मक अधिकाराला आणि स्वायत्ततेला बाधा आणणारे असू नयेत. प्रशासकीय आणि शैक्षणिक स्वायत्ततेचा योग्य तो आदर राखला गेलाच पाहिजे ह्यावर निःसंदिग्धपणे भर दिलेला दिसून येतो. ह्या पुस्तकात निकालपत्रांचा संपूर्ण तपशील देणे शक्य नसल्याने महत्त्वाच्या मुद्यांचा स्थूल आढावा घेण्यात आला आहे. माझी खात्री आहे की ह्यातून संबंधित घटकांमध्ये म्हणजे संस्थाचालक, शिक्षक, इतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी व्यक्ती इत्यादींमध्ये आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होईल. ह्या संबंधीत तपशीलवार माहितीत रस घेणाऱ्या इच्छूकांनी उपलब्ध अहवाल, पुस्तके तसेच संबंधित बेवसाईट ह्यांचा उपयोग करून घ्यावा.

वर उल्लेखिलेल्या तीन खटल्यांबरोबर स्वायत्तता, शिक्षणाचे खाजगीकरण ह्यावरील प्रस्तुत लेखकाच्या चार दशकांच्या शिक्षण क्षेत्रातील विविध पातळीवरील - प्राध्यापक, प्राचार्य, विद्यापीठीय समित्यांचे सदस्यत्व इत्यादि - स्वानुभवावर आधारित वस्तुनिष्ठ विचारावर आधारित लेख आहेत. कुव्यवस्थापन, गुणवत्तेकडे दुर्लक्ष,

विद्यार्थी आणि पालकांचे शोषण, नफेखोरी इत्यादि अपप्रवृत्तींना प्रस्तृत लेखकाचा कडवा विरोध आहे. तथापि प्रस्तुत लेखकाचा असा विश्वास आहे की काही अपवाद वगळता बहुतेक खाजगी शिक्षणसंस्था समाजहिताचे व्रत घेतलेल्या, सचोटीचे व्यवहार करणाऱ्या आणि पारदर्शकता जपणाऱ्या आहेत. काहींना ह्या लेखातील विचार एकांगी असल्याचा भास होईल पण इतर बाजू ऐकणे हाच ह्या लेखांचा प्रमुख उद्देश आहे. जास्तीत जास्त व्यक्तींनी ह्यावरील चर्चेत आणि वादविवादात भाग घेऊन आणि मतं मांडावी अशी विनंती आहे कारण शिक्षणक्षेत्रातील चुका दुरूस्त करण्याचा तो खात्रीचा उपाय आहे.

ह्या लेखात काही ठिकाणी विद्यापीठीय आणि शासकीय यंत्रणा आणि धोरणे ह्यातील दोषांवर टीका करावी लागली असली तरी आम्ही ह्या दोन महत्त्वाच्या घटकांचे विरोधक नसून त्यांच्या स्थानाचा आम्हाला आदरच आहे. विविध घटकांमध्ये परस्पर विश्वास आणि सामंजस्य प्रस्थापित व्हावे हीच आमची तळमळ आहे. कारण अशा एकत्रित येण्यामुळेच समाज, युवक आणि शिक्षण ह्यांना गुणवत्तेच्या शिखरावर नेण्याचे आपल्या सर्वांचे उद्दिष्ट साध्य होईल.

शेवटां पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे कृतज्ञतेचे दोन शब्द. सर्वप्रथम विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, ज्यांच्या अविरत आणि उक प्रोत्साहनामुळेच ही निर्मिती शक्य झाली. त्यांच्याशी होणाऱ्या अनौपचारिक गप्पा आणि औपचारिक चर्चा हा ह्या पुस्तकाचा आणि खास करून दोन लेखांचा उगमस्त्रोत आहे. त्यांचे मार्गदर्शन विचारप्रवर्तक आणि अमूल्य आहे. प्राचार्या ( डॉ.) सिंग, प्रा. भिडे, प्रा. बारसे, प्रा.भाबड, प्रा. संतोष  राणे ह्यांच्या सूचनांची आणि सहकार्याची फार मदत ह्या प्रकल्पात झाली. जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि खास करून स सौ. थेटे, सौ. हेमा चितळे, सौ. मनाली आंबोकर, सौ. वैदेही मोघे, कुमारी निलाक्षी केळकर ह्यांनी विनातक्रार ह्या लेखांचे पुन्हा पुन्हा टंकलेखन केले, हे मी विसरू शकणार नाही. शेवटी परफेक्ट प्रिंटचे श्री. विलास सांगुर्डेकर आणि त्यांचे कर्मचारी ह्यानी अतिअल्प वेळ असूनही काम पूर्ण केले त्यांना धन्यवाद.

**माजी प्राचार्य स.वा.गोखले**
संकुल समन्वयक
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.



# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | **प्रस्तावना** | ३ |
| २. | **भूमिका** | ६ |
| ३. | **टी.एम.ए.पै फाउंडेशन आणि इतर विरुध्द कर्नाटक राज्य आणि इतर** | ११ |
| ४. | **ब्राह्मोसमाज विरुद्ध प. बंगाल सरकार शासकीय अनुदान प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक संस्थामधील शिक्षकांच्या नेमणूकी संबंधात शासनाची भूमिका** | २६ |
| ५. | **पी.के. इनामदार आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर खाजगी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयातील सरकारी कोटा** | ३१ |
| ६. | **शिक्षणाचे खाजगीकरण : काळाची गरज** | ४३ |
| ७. | **The Role** | ५५ |
| ८. | **T.M.A. Pai Foundation and Others v/s State of Karnataka & Others** | ५८ |
| ९. | **Brahmo Samaj v/s. State of West Bengal Role of State in Appointment of Teachers in Aided Educational Institutions** | ७८ |
| १०. | **P. K. Inamdar & Others v/s State of Maharashtra & Others Govt. Quota in Private Engineering and Medical Colleges** | ८३ |
| ११. | **Privatization of Education - A Need of theTime** | ९७ |

# टी.एम.ए.पै फाऊंडेशन आणि इतर
# विरुध्द
# कर्नाटक राज्य आणि इतर

**• पार्श्वभूमी**

जुन्या काळात शिक्षण म्हणजे धर्मादाय अथवा समाजहितैषी विषय समजला जात असे आणि दानशूर तसेच शिक्षण प्रेमी व्यक्ती ह्याच दृष्टीकोनातून शिक्षणसंस्थांची स्थापना करीत व प्रसंगी पदरमोड करुन ह्या संस्था चालवीत. हळूहळू त्याचे रुपांतर व्यवसायात झाले. काही ठिकाणी तर ह्याला उद्योगधंदा असे संबोधले जाऊ लागले. शिकणे अथवा शिक्षण प्राप्त करणे हा मूलभूत हक्क आहे की नाही हा वादाचा विषय असला तरी शिकवणे म्हणजे शिक्षणसंस्थांची स्थापना करुन त्यांचे व्यवस्थापन करणे हा मात्र घटनेच्या १९ (१) (ग) आणि कलम २६(अ) अन्वये घटनात्मक मूलभूत हक्क म्हणून मान्य केला गेलेला आहे. अर्थात ह्या व्यवसायात नफा कमावणे ह उद्देश नसेल ह्या अटीवरच घटनेचे संरक्षण प्राप्त होते. सध्या काहींच्या बाबतीत हे उदरभरणाचे साधन आहे तर काहींसाठी ही निरपेक्ष समाजसेवा आहे.

शिक्षण, शिक्षणसंस्था इत्यादी ह्या प्रदीर्घ काळापासून कोर्टकचेऱ्या, दावे, खटले, याचिका इत्यादींचा विषय बनल्या आहेत. ह्यामध्ये शिक्षणसंस्था, पालक, शिक्षक, संस्थाचालक, शासन, विद्यापीठ इत्यादींशी संबंधित अनेक बाजूंचा अंतर्भाव आहे. ह्या सर्वात पै फाऊंडेशन ह्या नावाने सर्वपरिचित असलेला टी.एम.ए.पै फाऊंडेशन विरुद्ध कर्नाटक सरकार हा अनेक कारणांनी मार्गदर्शक ठरलेला खटला अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अर्थात त्यापूर्वीही अनेक शैक्षणिक खटल्यांमधून विविध विषयांची सखोल चर्चा झालेली आढळून येते. ह्यासंदर्भात चार दाव्यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो ते म्हणजे

- ऊन्नीकृष्णन् विरुद्ध आंध्र सरकार (१९९३)
- सेंट स्टीफन्स कॉलेज विरुद्ध दिल्ली विद्यापीठ (१९९२)
- अहमदाबाद सेंट झेविअर्स कॉलेज विरुद्ध गुजरात राज्य (१९७४)
- केरळा एज्युकेशन बिल, १९५७ (१९५८)



इतर अनेक दाव्यांबरोबर वरील चारांचाही पै फाऊंडेशनच्या दाव्यात विशेष करुन विचार केला गेला. इस्लामिक ॲकॅडमीने १९९३ साली दाखल केलेल्या याचिकेबाबत सेंट स्टीफन मधील निकालाबद्दल शंका व्यक्त केली गेली. सेंट स्टीफन मधील निकाल ५ न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिला असल्याने ७ न्यायाधीशांपुढे याचिका दाखल करावी असा आदेश दिला गेला. तथापि शिक्षणासबंधातील ४२ व्या घटनादुरुस्तीचा खंडपीठाला विचार करणे आवश्यक ठरले. त्यामुळे ७ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने असे सुचवले की ह्या याचिकेची सुनावणी विस्तृत अशा ११ न्यायमूर्तींच्या पुढे चालवली जावी. ह्या विस्तृत घटना पीठाने असे नमूद केले की केरला एज्युकेशन बिल आणि सेंट झेविअर्स मधील निकाल बंधनकारक नसून हे न्यायपीठ घटनेच्या कलम ३० (१) चा योग्य अर्थ लावून त्यावर अधिकारपूर्ण भाष्य करील.

पै फाऊंडेशनच्या घटनापीठ स्थापनेची ही पार्श्वभूमी आहे. अशा रितीने सर्वोच्च न्यायालयात अभावानेच अनुभवास येणारे ११ न्यायमूर्तींचे घटनापीठ प्रमुख न्यायमूर्ती श्री.किरपाल ह्यांच्या नेतृत्वाखाली टी.एम्..ए.पै फाऊंडेशन विरुद्ध कर्नाटक राज्य (२००२) ८ ४८१ ह्या याचिकेवरील वाद-प्रतिवाद ऐकण्यास व त्यावर आपला अधिकारपूर्ण व मार्गदर्शक निकाल ऐकवण्यास सज्ज झाले.

**♦ प्रश्न आणि त्यांचे वर्गीकरण**

ह्या खटल्यात उत्तरे देण्यासाठी एकूण अकरा प्रश्न निश्चित करण्यात येऊन त्यांची पुढील पाच गटात विभागणी करण्यात आली.

**अ)** शिक्षण संस्थांची उभारणी हा मूलभूत हक्क आहे का ? असल्यास कोणत्या तरतुदीनुसार ?

**ब)** ऊन्नीकृष्णन् निकालाचा पुनर्विचार आवश्यक आहे का ?

**क)** खाजगी शिक्षणसंस्थांचे नियमन शासन करु शकते का ? असल्यास त्याच्या मर्यादा कोणत्या?

**ठ)** कलम ३० च्या संदर्भात, धर्माधिष्ठित किंवा भाषाधिष्ठित अल्पसंख्य दर्जा ठरवताना तो राज्यानुसार ठरवावा की संपूर्ण राष्ट्राच्या संदर्भात निश्चित करावा?

**इ)** अनुदानित खाजगी अल्पसंख्यांक शिक्षणसंस्थांचे प्रशासकीय हक्क कुठपर्यंत नियंत्रित करता येतील ?

वरील पाच गटांच्या संदर्भात पुढील अकरा प्रश्न उपस्थित करण्यात येऊन त्यांची तपशीलवार सुरुवात न्यायालयापुढे करण्यात आली.

♦ **प्रश्न १** : घटनेच्या ३० व्या कलमानुसार अल्पसंख्य ह्या संज्ञेचा अर्थ आणि मसुदा काय ?

♦ **प्रश्न २**: घटनेच्या कलम ३०(१) नुसार धर्म म्हणजे काय ? एखाद्या धर्माचा पंथ अथवा गट ह्या कलमानुसार अल्पसंख्य दर्जावर हक्क दाखवू शकतो का ?

♦ **उत्तर** : ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या घटनापीठाने देण्याची गरज नाही. नियमित न्यायालयाने ह्याचा विचार करावा.

♦ **प्रश्न ३ (अ)** : शैक्षणिक संस्थेचा अल्पसंख्यांक दर्जा ठरवणारे निर्देशांक कोणते?

♦ **उत्तर** : ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या घटनापीठाने देण्याची गरज नाही. नियमित न्यायालयाने ह्याचा विचार करावा.

**प्रश्न ३ (ब)** : व्यावसायिक शिक्षण कुठपर्यंत घटनेच्या ३०(१) कलमानुसार अल्पसंख्य हक्कास पात्र ठरते ?

♦ **प्रश्न ४** : अल्पसंख्य शिक्षण संस्थांतील ( अनुदानित व विनाअनुदानित ) प्रवेशाचे नियंत्रण करण्याचा हक्क शासन अथवा विद्यापीठाला आहे का ?

♦ **प्रश्न ५(अ)** : अल्पसंख्य संस्थांच्या, शैक्षणिक संस्थांची स्थापना आणि व्यवस्थापन, ह्या हक्कात प्रवेश प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांची निवड ह्यांचा अंतर्भाव होतो का ?

♦ **प्रश्न ५(ब)** अल्पसंख्य संस्थांच्या विद्यार्थ्यांची निवड आणि प्रवेशाची प्रक्रिया व पद्धत ठरवणे ह्या अधिकारावर सरकारी अनुदान स्वीकारण्याचा परीणाम होतो का ?

♦ **प्रश्न ५(क)** : शैक्षणिक संस्थांवरील नियंत्रणे, व्यवस्थापन मंडळावरील नियंत्रण, संलग्नता, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका, शुल्क निश्चिती इत्यादी संदर्भातील वैधानिक तरतुदींचा अल्पसंख्य संस्थांच्या प्रशासकीय अधिकारात हस्तक्षेप होतो का?

♦ **प्रश्न ६ (अ)** : अल्पसंख्य संस्थेची उभारणी कुठे (स्थान) करता येते - इ.



♦ **उत्तर** : ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या खंडपीठाने द्यायची गरज नाही. नियमित न्यायालयाने ह्याचा विचार करावा.

♦ **प्रश्न ६ (ब)** : असे म्हणणे योग्य आहे का की अ ह्या राज्यात रहणाऱ्या अल्पसंख्य गटातील लोकांनाच त्या राज्यातील अल्पसंख्य संस्थांचे सभासद मानता येईल ?

♦ **उत्तर** : ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या खंडपीठाने द्यायची गरज नाही. नियमित न्यायालयाने ह्याचा विचार करावा.

♦ **प्रश्न ७** : एखाद्या राज्यात भाषाधिष्ठीत अल्पसंख्य नसलेल्या व्यक्ती दुसऱ्या राज्यात संस्था स्थापन करुन मूळ बदल्यात अल्पसंख्य दर्जा व हक्क सांगू शकतात का?

♦ **उत्तर** : ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या खंडपीठाने द्यायची गरज नाही. नियमित न्यायालयाने ह्याचा विचार करावा.

♦ **प्रश्न ८** : ह्या न्यायालयाने सेंट स्टीफन्स खटल्यात व्यक्त केलेले प्रमाण योग्य आहे का ? नसल्यास काय आदेश ?

♦ **प्रश्न ९**: उन्नीकृष्णन् दाव्यात ह्या न्यायालयाने दिलेल्या निकालाचा (प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क आहे हा भाग वगळून) व त्यावर आधारित योजनेचा पुनर्विचार व त्यात बदल करण्याची गरज आहे का ?

♦ **प्रश्न १०.** कलम २१ आणि २९ (१) चा कलम १४ व १५(१) च्या बरोबरीने विचार केल्यास अल्प संख्यांकाप्रमाणे इतरांनाही (अल्प संख्येतर) शिक्षण संस्था स्थापन करुन त्यांचे व्यवस्थापन करण्याचा हक्क आहे का?

♦ **प्रश्न ११.** घटनांतर्गत विविध तरतुदींच्या संदर्भात शिक्षण आणि शिक्षण संस्था या संज्ञांचा नेमका अर्थ काय? भारतीय घटनेत शिक्षण संस्थांची स्थापना व त्यांचे व्यवस्थापन यांची हमी दिलेली आहे का?

वरील प्रमाणे विचार करुन घटनापीठाने आपली कार्यकक्षा निश्चित केली. त्यानुसार पुढील प्रश्न वगळण्यात आले. व त्यांची उत्तर देण्याची जबाबदारी नियमीत खंडपिठाकडे सोपविण्यात आली.

प्रश्न २, प्रश्न ३(अ), प्रश्न ६(अ,ब),प्रश्न ७ म्हणजे या घटना पिठाने एकूण ११ प्रश्नांपैकी प्रश्न १, प्रश्न ३(ब), प्रश्न ४, प्रश्न ५(अ,ब,क), प्रश्न ८, प्रश्न ९, प्रश्न १० आणि प्रश्न ११. ह्यांचा विचार करुन आपला निकाल दिला.

- **युक्तिवाद**

**१)** खटल्यात सहभागी असलेल्या शिक्षण संस्थांच्या वतीने तज्ज्ञ आणि अनुभवी वकीलांनी असे प्रतिपादन केले की शैक्षणिक संस्थांची स्थापना आणि व्यवस्थापन हा भारतीय घटनेने बहाल केलेला मुलभूत हक्क आहे. बहुसंख्यांच्या बाबतीत हा हक्क घटनेच्या कलम १९(१) (ग) आणि / किंवा कलम २६ प्रमाणे प्राप्त होतो तर धर्माधिष्ठीत अथवा भाषाधिष्ठीत अल्पसंख्यांकासाठी ह्या हक्काचा अंतर्भाव कलम (३०) मध्ये केलेला आहे. त्यांनी असे मत मांडले की खाजगी शिक्षण संस्थाना संपूर्ण प्रशासकीय स्वायत्तता असावयास हवी. अशा संस्थांना मान्यता आणि / अथवा संलग्नतेसाठी नियम आणि अटी स्वीकाराव्या लागतात. ह्या अटी गुणवत्तायुक्त शिक्षणाच्या संदर्भात असून त्यात शिक्षकांची (व इतर कर्मचाऱ्यांची) शैक्षणिक पात्रता, अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठी किमान आवश्यक सोयी व सुविधा इत्यादींचा समावेश होतो. पण त्याच्या आडून सरकारने ह्या संस्थांच्या कारभारात ढवळाढवळ करु नये. संस्थांच्या प्रतिनिधींची हरकत प्रामुख्याने, व्यवस्थापन मंडळावर सरकारी प्रतिनिधी लादणे, प्रवेश प्रक्रीयेत व शुल्क निश्चितीत सरकारी हस्तक्षेप शिक्षकांच्या नेमणूकी शासनामार्फत करणे, अशा विविध गोष्टींना होता. ह्यामुळे खाजगी शिक्षण संस्थांची स्वायत्तता नष्ट होऊन त्यांची स्थिती एखाद्या शासकीय खात्याप्रमाणे होते. सरकारच्या ह्या स्वरुपाच्या हस्तक्षेपाला खाजगी शिक्षण संस्थांचा असलेला विरोध त्यांच्या वकीलानी कोर्टात निःसंदिग्धपणे मांडला.

**२)** शिक्षण संस्थांचे वकील तसेच भारतीय संघराज्यातर्फे महाकायदेपंडीत (सॉलिसीटर जनरल ) यानी असा आग्रह धरला की उन्नीकृष्णन् वि. आंध्रप्रदेश ह्या खटल्यांचा पुनर्विचार ह्या न्यायापीठाने करावा. ह्या बाबतीत असे प्रतिपादन करण्यात आले की, उन्नीकृष्णन् खटल्यात तयार केलेल्या योजनेमुळे सर्व शिक्षणसंस्था आणि खास करुन अल्पसंख्यांक संस्था ह्यांच्यावर अवाजवी बंधने आली असून त्यांना घटनेने बहाल केलेल्या हक्कावर अतिक्रमण होत आहे. त्याहीपेक्षा ज्यासाठी ही योजना मांडली गेली ती उद्दीष्टे कधीच प्राप्त झाली नाहीत.



**३)** खाजगी अल्पसंख्यांक संस्थांतर्फे त्यांचा युक्तीवादही सादर करण्यात आला. त्यानुसार असे प्रतिपादन करण्यात आले की घटनेतील विविध तरतुदींचा आणि खास करुन कलम २९ आणि ३० चा योग्य अर्थ लावल्यास असे स्पष्ट होते की अल्पसंख्यांकांना त्यांच्या निवडीनुसार शैक्षणिक संस्थांची स्थापना आणि त्यांचे व्यवस्थापन ह्याचा हक्क आहे. कलम ३०(१) मधील त्यांच्या निवडीनुसार ह्या विशेषणावरुन हे निर्विवादपणे सिद्ध होते की भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्यांक, शाळा, महाविद्यालय, व्यवसायिक महाविद्यालय अशा कोणत्याही प्रकारच्या शैक्षणिक संस्थांची स्थापना करु शकतात. ह्या संदर्भात असे नमूद करण्यात आले की अशा प्रकारच्या शैक्षणिक संस्था विशिष्ट भाषेच्या अथवा धर्माच्या विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी स्थापन करण्यात येत असल्याने ह्या संस्थांना इच्छेनुसार अथवा तारतम्यानुसार प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या निवडीचा हक्क असलाच पाहिजे. कलम ३०(२) ची तरतुद अशा संस्थांना, त्या केवळ अल्पसंख्या आहेत ह्या कारणास्तव अनुदान नाकारले जाऊ नये ह्यासाठी करण्यात आलेली आहे. पुढे असे प्रतिपादन करण्यात आले की अनुदान मंजूर करताना ह्या संस्थांच्या अल्पसंख्य दर्जाला धक्का लागेल अथवा त्यांचे अधिकार संकुचित होतील अशा कोणत्याही अटी घालण्यात येऊ नयेत. कलम २९(२) ह्या संस्थांना लागू करु नये अथवा त्याचा अर्थ असा लावला जावू नये ज्यामुळे अल्पसंख्य संस्थांच्या आपल्या समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या हक्कावर अयोग्य निर्बंध लादले जातील. आरोग्य, शहर नियोजन आणि विकास इत्यादी विषयक धर्मनिरपेक्ष कायदे ह्या संस्थांना लागू होत असले तर त्यांच्या व्यवस्थापन हक्कात हस्तक्षेप करणारे कोणतेही कायदे अथवा नियम त्यांच्यावर लादले जाऊ नयेत. निष्णात कायदेतज्ज्ञांनी खास करुन ह्यावर भर दिला की, संचालक मंडळाची निर्मिती, शिक्षकांच्या नेमणूका आणि विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी हक्क हे व्यवस्थापनाच्या मूलभूत हक्काचा अविभाज्य भाग आहेत. हे हक्क व्यवस्थापनाचे अंगभूत घटक असल्याने त्यांच्यावर बंधने घालणे पूर्णपणे अयोग्य व बेकायदेशीर आहे. मान्यता अथवा संलग्नता देताना शिक्षकाची पात्रता तसेच विद्यार्थ्यांची प्रवेश विषयक पात्रता इत्यादी संबंधी नियम असणे अविवाद्य आहे तथापि शिक्षकांच्या नेमणूकीची पद्धत आणि स्वरुप तसेच विद्यार्थ्यांची निवड ह्या संदर्भातील संपूर्ण हक्क पूर्णपणे शैक्षणिक संस्थेच्या हातीच असावयास हवे.

**४)** खाजगी, बिगर अल्पसंख्य, विनाअनुदानित शिक्षणसंस्थांतर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, समता आणि धर्मनिरपेक्षता हे भारतीय घटनेच्या पायाभूत रचनेचे

घटक असल्याने खाजगी अल्पसंख्य संस्थांना मिळणारे सर्व हक्क बिगर-अल्पसंख्य संस्थांना आपोआपच मिळावयास हवे. घटनेच्या कलम १९(६) नुसार वाजवी बंधने स्वीकारणीय असली तरी बिगर-अल्पसंख्य शैक्षणिक संस्थांना, अल्पसंख्य संस्थांसारखेच व्यवस्थापन स्वातंत्र्य असलेच पाहिजे ह्यावर सादरीकरणात, विशेष भर दिला गेला.

**५)** मा. महाकायदे पंडीत ह्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन करण्याविषयी अल्पसंख्यांक (कलम ३०) आणि बिगर-अल्पसंख्यांक (कलम १९ आणि २६) ह्यांना असलेला घटनात्मक मुलभूत हक्क मान्य केला. त्याचप्रमाणे उन्नीकृष्णन् निवाड्याचे पुनर्विलोकन आणि खाजगी विनाअनुदानित संस्थांना अधिक स्वायत्तता देण्याची गरज ह्या संबंधी युक्तीवादाशी सहमती दर्शविली. तथापी त्यांनी असं प्रतिपादन केले की कलम २९(२) हे अल्पसंख्यांक संस्थांना लागू आहे. तसेच अशा संस्थांचा केवळ त्यांच्याच धर्माच्या अथवा भाषेच्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्याचा त्यांचा दावा अमान्य केला. त्यांनी असे प्रतिपादन केले की कलम २९(२) नुसार कोणालाही धर्म, जात, वंश, भाषा इत्यादींच्या आधारावर प्रवेश न नाकारणे हे अल्पसंख्य संस्थांनाही बंधनकारक आहे.

**६)** महा-कायदेपंडीतांनी कलम २९(२) आणि ३०(१) बाबत व्यक्त केलेल्या मतांशी अनेक राज्यांनी असहमती दर्शवली. मध्यप्रदेश छत्तीसगड व राजस्थान ह्यांनी असे प्रतिपादन केले की, कलम ३०(१) मधील त्यांच्या मताप्रमाणेच ह्या विशिष्ट शब्दयोजनेच्या आधारावर अल्पसंख्य संस्थांना त्यांच्या अल्पसंख्य गटाच्या उमेदवारांना प्रवेश देण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे आणि ह्या संस्थांची इतर गटांना प्रवेश न देण्याची असमर्थता म्हणजे प्रवेशास नकार असा कलम २९(२) अन्वये लावलेला अर्थ योग्य नाही. आंध्रप्रदेशाने ह्या दोन कलमातील परस्पर संबंधाचा प्रत्यक्ष उल्लेख न करता असे प्रतिपादन केले की, अल्पसंख्या शिक्षण संस्था ह्या त्या त्या गटांच्या फायद्यासाठी स्थापन केल्या गेल्या असल्याने किमान ५०% प्रवेश विशिष्ट अल्पसंख्या विद्यार्थ्यांमधून भरल्या जाव्यात हे बंधन म्हणजे प्रचलीत नियम समजला जावा, आणि खालील अटींची पूर्तता करणाऱ्या संस्थेला अल्पसंख्य संस्था समजले जावे.

- संस्थेच्या कार्यकारीणीचे सर्व सभासद त्या विशिष्ट धर्माचे / भाषेचे असावयास हवे.



- संस्थेने व्यवस्थापनाला असलेल्या मर्यादेतच अल्पसंख्य विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. न्यायालयाने राज्यांना ह्या बाबतीत योग्य ते नियम करण्यास अनुमती द्यावी आणि कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्य विद्यार्थ्यांचे प्रवेश एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा जास्त होऊ देऊ नयेत.

**७)** केरळ सरकारने कलम २९(२) चा प्रत्यक्ष उल्लेख न करता असे मत व्यक्त केले की, अल्पसंख्यांचे घटनात्मक अधिकार व्यावसायिक शिक्षणसंस्थांना लागू करावे पण त्यांनाही किमान ५०% पर्यंतच अल्पसंख्य समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे बंधनकारक असावेत.

**८)** कर्नाटक राज्याच्या मते अनुदान हा हक्क नसला तरी ते प्राप्त होणाऱ्या अल्पसंख्य संस्थांचे अल्पसंख्य संस्था हे वैशिष्टय अबाधित रहावयास हवे. अनुदान मंजूरीत भेदाभेद नसावेत आणि अनुदानित अल्पसंख्य संस्थांच्या हक्कांना संरक्षण द्यावयास हवे.

**९)** तामिळनाडू, पंजाब, महाराष्ट्र, प. बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश ह्या राज्यांनी कलम २९(२) चा कलम ३०(१) वरील प्रभाव अधोरेखीत करुन असे सादर केले की, अनुदानित अल्पसंख्य संस्थांचा त्यांच्या जमातीच्या विद्यार्थ्यांना, जमातीच्या गरजे नुसार प्रवेश देण्याचा हक्क नष्ट होतो.

**१०)** महा-कायदेपंडीतांनी न्यायालयाच्या इच्छेनुसार घटनात्मक बाबींवर व्यक्ती निरपेक्ष आणि समतोल मत सादर केले ह्या बद्दल न्यायमुर्तींनी त्यांची तसेच इतर कायदेतज्ज्ञांनी मांडलेल्या मतांची योग्य ती नोंद घेऊन संतोष व्यक्त केला.

**११)** वर उल्लेखिलेल्या ११ पैकी ४ प्रश्नांचा विचार करण्याची घटनापीठाला गरज न भासल्याने त्या संदर्भात युक्तीवाद सादर झाले नाहीत.

विविध राज्ये, महा-कायदेपंडीत, इतर कायदेतज्ज्ञ इत्यादीचे वाद प्रतिवाद ऐकून त्यावरुन घटनापीठाने एकूण समस्यांचे ५ गटात वर्गीकरण केले व त्यानुसार निवाडा देण्यासाठी ११ प्रश्न नोंदवले ह्या पैकी काही प्रश्नांवर नियमीत न्यायालयाने विचार करावा असे मत व्यक्त करुन घटनापीठाने पुढीलप्रमाणे निकाल दिला.

♦ **निकालपत्र :**

ह्या खटल्यात एकूण ५ निकालपत्रे पुढीलप्रमाणे देण्यात आली.

● <u>बहुमताचा निकालः</u> प्रमुख न्यायमूर्ती बी. जे. किरपाल
न्या. बी. जी. पटनायक
न्या. के. जी. बालकृष्णन्
न्या. पी.बेरी
न्या. अरीजीत पसायत

● अल्पमत निकालः न्या. व्ही. एन. खरे
न्या. सैद. मोहम्मद काद्री
न्या. रुमा पाल
न्या. एस. एन. बरीआवा आणि न्या अशोक भान

बहुमताचा निकाल सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश मा. बी.जे. किरपाल ह्यांनी आपण स्वतः आणि वर उल्लेखिलेल्या इतर पाच न्यायाधीशांच्या वतीने जाहीर केला. ह्यात त्यांनी वरील अकरापैकी विचारासाठी निवडलेल्या पुढील प्रश्नांची उत्तरे दिली.

♦ **मा. किरपाल बी.जे. प्रमुख न्यायाधीश**

"भारत हा भाषा, धर्म, पंथ, संस्कृती, जात इत्यादी विविधतेने नटलेला देश आहे. सर्व नागरीकांना राजकीय स्वातंत्र्य असूनही अनेक नागरीक अशिक्षित आणि दारीद्र्य रेषेखाली जगणारे आहेत. शिक्षणच हा भारतीयांच्या प्रगतीचा व उन्नतीचा एकमेव प्रभावी उपाय आहे. मर्यादित साधनसामग्री व मंद गतीने कार्य करणारी यंत्रणा ह्यामुळे भारतीयांची गुणवत्ता संपूर्णपणे पृष्ठभागावर आणण्याची क्षमता शासनामध्ये नाही. अनेक बाबतीत असे अढळून येते. यांत्रिक पद्धतीच्या शिक्षण पद्धातीतून केवळ बोरु बहाद्दर निर्माण होतात पण समाजाला आवश्यक तो रोजगार ह्यातून निर्माण होऊ शकत नाही.

संख्यात्मक आणि गुणात्मक हा दोन्ही आघाड्यांवर सरकार शिक्षण उपलब्ध करुन देऊ शकत नाही. दर्जेदार, व्यावसायिक, रोजगार भिमुख शिक्षण तर सोडाच पण पूरेशा शाळा आणि महाविद्यालये उपलब्ध करुन देण्यास शासन असमर्थ आहे. ह्या परिस्थितीत खाजगी शिक्षण संस्था ह्याच शैक्षणिक उन्नतीचा एकमेव पर्याय उरतो. शिक्षण प्रेमी, समाजहितैषी व्यक्ति आणि संस्था त्याचप्रमाणे आपल्या धर्माच्या अथवा भाषेच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्या विविध अल्पसंख्य शिक्षण संस्था इत्यादींचा विचार या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरतो. ह्या सर्व संस्थांची प्रमुख वेदना म्हणजे नियम,



अटी, कायदे कानून इत्यादींच्या स्वरुपात त्यांच्यावर लादले जाणारे अनावश्यक आणि अनुत्पादक ओझ्यातून निर्माण होते. ह्या शासकीय असमर्थनीय हस्तक्षेपाने शिक्षणाची प्रगती रोखली जाते. या संस्थांची प्रमुख मागणी म्हणजे शासननिर्मित बंधने दूर करुन त्यांना शैक्षणिक विकास साधण्यासाठी योग्य आणि आवश्यक असे स्वातंत्र्य व स्वायत्तता प्राप्त व्हावी. अनुदानित तसेच विनाअनुदानित, अल्पसंख्य, बहुसंख्य इत्यादी सर्वच शिक्षणसंस्थांचा असा दावा आहे की ही बंधने नोकरशाहीने स्वतःचे महत्व वाढविण्यासाठी निर्माण केलेली असून शैक्षणिक गुणवत्ता, विकास, प्रगती इत्यादींशी त्यांचा काही संबंध नाही. खाजगी शिक्षण संस्थांच्या व्यथांमधून अनेक महत्त्वाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांचे योग्य ते निराकरण करण्याचा प्रयत्न हे घटनापीठ करीत आहे."

*प्रश्न १ : भारतीय घटनेच्या कलम ३० नुसार 'अल्पसंख्य' म्हणजे काय ?*

उत्तर : घटनेच्या ३० व्या कलमात धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांचा अंतर्भाव आहे. भारतात भाषावार प्रांतरचना ह्या तत्त्वावर विविध राज्ये निर्माण करण्यात आली असल्याने अल्पसंख्य ह्या संकल्पनेची मर्यादा राज्य हीच आहे. त्यामुळे संपूर्ण देशाच्या संदर्भात त्याचा विचार करता येणार नाही. धर्माधिष्ठीत व भाषाधिष्ठीत अल्पसंख्यांकांचा एकत्रित विचार कलम ३० मध्ये केला असल्याने दोन्हींच्या बाबतीत 'राज्य' हीच मर्यादा ठरते.

*प्रश्न २ कलम ३० खालील अल्पसंख्यांचे हक्क व्यावसायिक शिक्षणाला कितपत लागू होतात ?*

उत्तर : कलम ३० नुसार धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकाना त्यांच्या इच्छेनुसार शिक्षणसंस्थांची स्थापना आणि प्रशासन ह्यासबंधी हक्क दिलेले आहेत. 'त्यांच्या इच्छेनुसार' ह्या शब्दसमुहावरुन हे स्पष्ट हेते की व्यावसायिक शिक्षण संस्थांना देखील हे हक्क लागू होतात.

*प्रश्न ४ अनुदानित अथवा विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे नियमन करण्याचा अधिकार शासन अथवा संबंधित विद्यापीठाला आहे काय?*

उत्तर : विनाअनुदानित अल्पसंख्य शिक्षणसंस्थांमधील म्हणजे शाळा तसेच पदवीपूर्व महविद्यालये, प्रवेशाचे नियंत्रण शासन अथवा विद्यापीठाच्या हातात असू नये कारण या पातळीवर गुणवत्ताधिष्ठित निवडीला जवळजवळ वाव नसतो. अर्थात

शैक्षणिक पातळी राखण्यासाठी सरकार वा विद्यापीठ प्रवेशासाठी आवश्यक पात्रता व इतर किमान अटी घालू शकते. घटनेच्या कलम ३० नुसार आपल्या आवडीच्या शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा हक्क मान्य केलेला असल्याने आणि विद्यार्थ्यांचा प्रवेश हा ह्या हक्काचा अविभाज्य घटक असल्याने त्यात सरकार अथवा विद्यापीठ हस्तक्षेप करु शकत नाही अर्थात ह्यात प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गुणवत्तेला न्याय ह्या गोष्टी गृहीत धरल्या आहेत. प्रशासकीय हक्क निरपेक्ष नसल्याने, शिक्षणाची उच्च पातळी राखण्याच्या दृष्टीने आवश्यक ते नियमनात्मक उपाय शासन लागु करु शकते. व्यावसायिक संस्थांमधील प्रवेशाच्या बाबतीत ह्याला विशेष महत्त्व आहे.

अल्प संख्य संस्थांना सरकारी अनुदान प्राप्त झाले तर त्यामुळे त्यांच्या अल्पसंख्य दर्जाला धक्का बसत नाही अर्थात अनुदानित अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेलादेखील त्या त्या अल्पसंख्य गटाचा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा हक्क आहे त्याच वेळी अल्पसंख्येतर विद्यार्थ्यांना वाजवी मर्यादेपर्यंत त्यांनी प्रवेश दिला पाहिजे ह्यामुळे एका बाजुने कलम ३० ने शिक्षणसंस्थाना दिलेले हक्क अबाधित राहतात तर दुसऱ्या बाजुने कलम २९(२) मधील नागरीकांच्या हक्कांवर देखील अतिक्रमण होत नाही. वाजवी मर्यादा कोणती ही गोष्ट शिक्षणसंस्थांचे स्वरुप, शिक्षणक्रमाचा प्रकार, शैक्षणिक गरजा इत्यादी विविध घटकांवर अवलंबून असते.ह्या गोष्टींचा विचार करुन संबंधित राज्य शासनाने अल्पसंख्येतर विद्यार्थी प्रवेशासंबंधी सूचना द्यावयास हव्यात. अल्पसंख्य कोट्याच्या बाबतीत गटांतर्गत गुणवत्ता निकषाचं पालन व्हावयास हवं. अनुदानित व्यावसायिक शिक्षणसंस्थांतील प्रवेशासाठी सरकारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अल्पसंख्येतर गटाच्या प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना देखील सामायिक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणं ही सर्वसामान्य अट आहे. त्याठिकाणी समुपदेशन उपलब्ध असल्यास तेही विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे.

*प्रश्न.५ (अ) अल्पसंख्यांकांच्या, स्वतःच्या इच्छेनुसार शिक्षणसंस्था स्थापन करण्याच्या हक्कात प्रवेश प्रक्रिया आणि पद्धती तसेच विद्यार्थ्यांची निवड ह्यांचा अंतर्भाव होतो का ?*

उत्तर : अल्पसंख्यांक शिक्षणसंस्थांची स्वतःची अशी प्रवेश प्रक्रिया आणि पद्धत असू शकते तसेच विद्यार्थी निवडीसंबंधी त्यांचे काही निकष असू शकतात. ह्या प्रक्रिया, पद्धती आणि निकष हे पारदर्शी आणि गुणवत्तेला न्याय देणारे असावयास हवेत. तसेच विद्यार्थी निवडीत गैर-व्यवस्थापनाला वाव असू नये. आपले हक्क



बजावताना विनाअनुदानित संस्थांना देखिल गुणवत्तेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कारण तसे केल्यास त्यांच्या शैक्षणिक दर्जालाच धक्का पोहोचतो.

*प्रश्न.५ (ब) अल्पसंख्य शिक्षणसंस्थांना अनुदान प्राप्त झाल्यामुळे, त्यांच्या प्रवेश प्रक्रिया आणि पद्धत निश्चिती तसेच विद्यार्थ्यांची निवड, ह्या हक्कांवर कोणत्याही प्रकारे परीणाम होतो का?*

उत्तर : व्यावसायिक शिक्षणसंस्थांना अनुदान मंजूर करताना काही नियम आणि अटी लागू करण्याचा शासनाला हक्क आहे. ह्यामध्ये गुणवत्ता तसेच शासनाचे आरक्षण धोरण ह्यांचा अंतर्भाव होतो. गुणवत्ता ठरवण्यासाठी सरकारची सामायिक प्रवेश परीक्षण, समुपदेशन, खाजगी संख्यांनी आयोजित केलेली प्रवेश परीक्षा इत्यादी पर्याय उपलब्ध असतात. ह्यापैकी कोणता पर्याय निवडावा ह्याचा निर्णय शासन अथवा विद्यापीठ ह्यांनी ठरवायचे आहे. अनुदानित व्यावसायिक शिक्षणसंस्थांतील प्रवेशासाठी इतर उपायांचा अवलंब करण्याची मुभा सक्षम अधिकाऱ्यांना आहे. ह्याबाबतीत समाजातील दुर्बल घटकांना प्राधान्य देण्यासाठी शासन अथवा विद्यापीठ आग्रह धरु शकते.

*प्र.५(क) प्रशासन विषयी, शैक्षणिक संस्थांवरील नियंत्रण, संचालक मंडळावरील नियंत्रण, संलग्नता / मान्यता, शिक्षक, प्राचार्य, कर्मचारी ह्यांच्या नेमणुका व सेवाशर्ती, शुल्क नियंत्रण इत्यादी संबंधीच्या वैधानिक तरतुदींमुळे अल्पसंख्यांच्या प्रशासकीय अधिकारात हस्तक्षेप होतो का ?*

उत्तर : प्रशासनाशी संबंधित वैधानिक तरतुदी विनाअनुदानित संस्थांमध्ये कमीत कमी असावयास हव्या. मान्यता आणि विद्यापीठीय संलग्नता ह्या सबंधी शर्तींचे पालन आवश्यक आहे. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणुका आणि त्यांच्यावरील व्यवस्थापकीय नियंत्रण अशा दैनंदिन प्रशासकीय बाबींमध्ये संस्था संचालकांना स्वातंत्र्य दिले पाहिजे म्हणजे ह्या बाबतीत कोणत्याही संस्थाबाह्य घटकांकडे नियंत्रण नसावे. कर्मचारी व शिक्षक ह्यांच्या नेमणुका आणि त्यांच्यावरील शिस्तभंगाच्या कारवाई संबधात संस्थेने वाजवी अशी पद्धत निर्माण केली पाहिजे. अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची आणि त्यांच्यावरील कारवाईची दखल घेण्यासाठी योग्य त्या लवादांचा विचार करावयास हवा तोपर्यंत जिल्हा न्यायाधिश पातळीशी समकक्ष विधी अधिकारी लवादाचे अध्यक्ष म्हणून नेमले जावे. शिक्षक अथवा प्राचार्य पदासाठी, किमान शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि गुणवत्तेशी संबंधित इतर अटी, शासन ठरवू शकते. अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या

सेवाशर्ती विषयक नियम ठरवण्याचा अधिकार शासनाला आहे. अर्थात ह्यामुळे संस्थेच्या प्रशासकीय हक्कात हस्तक्षेप होणार नाही ही काळजी घेणे आवश्यक आहे. विनाअनुदानित संस्थांनी आकारावयाच्या शुल्काचे नियंत्रण शासनाच्या हातात असू नये तथापी कॅपिटेशन फी आणि नफाखोरी ह्यावर सरकारी अंकुश असला पाहिजे.

*प्र. ८ ह्या कोर्टाने सेंट स्टीफन्स खटल्यात निर्धारीत केलेले प्रमाण योग्य आहे का? नसल्यास पुढील आदेश कोणते?*

उत्तर : आमच्या मते सेंट स्टीफन्समधील मुलभूत प्रमाण योग्य आहे तथापि निश्चित व कायमस्वरुपी प्रमाण ठरवणे योग्य नाही. संस्थेचे स्वरुप, लोकसंख्येची घडण आणि अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन सक्षम अधिकाऱ्यांनी वाजवी प्रमाण ठरवावे.

*प्र.९ उन्नीकृष्णन् विरुद्ध आंध्रप्रदेश दाव्यातील ह्या न्यायालयाच्या निकालाचा आणि त्या आधारे केलेल्या योजनांचा.पुनर्विचार करुन त्यात सुधारणा आवश्यक आहेत का?*

उत्तर : प्राथमिक शिक्षण हा मुलभूत हक्क आहे. भागाव्यतिरिक्त, ह्या न्यायालयाने उन्नीकृष्णन् खटल्यात तयार केलेली योजना आणि तिच्या अंमलबजावणीचे आदेश घटनाबाह्य आहेत. तथापि नफाखोरी आणि कॅपिटेशन फी ला असलेला आक्षेप योग्य आहे. विस्तार व सुविधा ह्यासाठी आवश्यक असा वाजवी वाटावा म्हणजे नफाखोरी नव्हे.

*प्र.१० : अल्पसंख्यांकाप्रमाणे बिगर अल्पसंख्यांकांना, कलम २१ व २९(१) तसेच १४ व १५(१) ह्यांचा एकत्रित विचार केल्यास, शैक्षणिक संस्थांची स्थापना व व्यवस्थापनाचा हक्क आहे का ?*

*प्र.११ शिक्षण आणि शिक्षणसंस्था ह्या संज्ञांचा घटनात्मक विविध तरतुदींनुसार अर्थ काय ? अशा संस्थांची स्थापना आणि व्यवस्थापन हक्काला घटनेमध्ये हमी दिलेली आहे का ?*

उत्तर : घटनेच्या दृष्टीने शिक्षण ह्या संकल्पनेत प्राथमिक शिक्षण ते पदव्युत्तर शिक्षण ह्या सर्व पातळ्यांचा अंतर्भाव होतो त्याप्रमाणे व्यावसायिक शिक्षण ही ह्यात समाविष्ट होते. शिक्षणाचा ह्या प्रमाणे अर्थ लावून असे शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणजे



शिक्षणसंस्था शिक्षणसंस्थांची स्थापना व व्यवस्थापन ह्या हक्काची हमी सर्व नागरिकांना घटनेच्या कलम १९(१) )(ग) आणि कलम २६ अन्वये तर अल्पसंख्याकांचा खास करुन कलम ३० अन्वये दिली आहे.

सर्व नागरिकांना शिक्षणसंस्था स्थापण्याचा व त्यांच्या व्यवस्थापनाचा हक्क कलम १९ (१) (ग) आणि कलम २६ अन्वये दिलेला आहे ह्यांवर कलम १९(६) आणि २६ (अ) ह्यामधील तरतुदी बंधनकारक आहेत. तथापि ह्या निकालपत्रात उल्लेख केल्याप्रमाणे अल्पसंख्यांक संस्थांना त्यांच्या समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा हक्क आहे.

बहुमत निवाडा - प्र.न्या.री.एन.किसाल आणि
न्या.पटनाईक, न्या. राजेंद्रन्, न्या.बालक्रिश्नन
न्या.रेड्डी, न्या.पसायत

♦ **अल्पमत विचार : सहमती आणि असहमती**

**१. न्या.व्ही.एन खरे**

बहुमताच्या निकालापत्रातील काही मुद्यांचे अधिक स्पष्टीकरण देऊन न्या.खरे ह्यांनी प्रमुख न्यायमुर्तींनी दिलेल्या बहुमताच्या निकालाशी सर्वसाधारण सहमती दाखवणारं आपलं स्वतंत्र निकालपत्र सादर केलं.

**२. न्या. काद्री**

मा.न्या. काद्री ह्यांनी काही मुद्यांवर आक्षेप घेत असताना बहुमतीय निकालपत्रातील प्र.१, २, ३,( अ , र ) आणि ह्या प्रश्नांच्या उत्तराशी सहमती दर्शवली. कलम २९ (२) आणि ३० (१) ह्यांच्या मागील भूमिका व स्पष्टीकरण विद्वान न्यायमूर्तींनी स्वतंत्रपणे मांडली. न्यायमूर्ती काद्री ह्यांनी बहुमताच्या इतर प्रश्नांच्या उत्तराशी सर्वसाधारण सहमती दर्शवली. प्र. ८ च्या बहुमताच्या उत्तराशी सहमती दर्शवताना त्यांनी कलम २९(२) आणि ३०(१) मधील परस्पर संबंधाचे वेगळे विवेचन केले आहे. त्यांनी शासनाला टक्केवारी ठरवू देणाऱ्या अधिकाराला आपला आक्षेप नोंदवला. प्र.५(ब) आणि १० व ११ ह्या संदर्भात त्यांनी पुढील विचार मांडले.

कलम १९(१) (ग) आणि २६ .प्रमाणे सर्व नागरीकांना शैक्षणिक संस्थांची स्थापना आणि व्यवस्थापनाचे हक्क आहेत. अल्पसंख्यांक हा हक्क कलम ३०(१) नुसार

विशेषत्वाने प्राप्त हेतो. ह्या दोन गटांच्या हक्कात भिन्नता आहे. कलम १९ व २६ ह्यांची कलम ३० च्या तरतुदींशी तुलना केल्यास हा फरक स्पष्ट होतो. सर्वसामान्य नागरीकांचे शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे अधिकारावर कलम १९(६) व २६ प्रमाणे मर्यादा पडतात. तथापि अल्पसंख्यांच्या कलम ३० नुसार प्राप्त होणाऱ्या अधिकारांवर अशी बंधने नाहीत म्हणजेच सर्वसामान्यांचे अधिकार हे सापेक्ष आहेत तर अल्पसंख्यांकांचे तेच अधिकार निरपेक्ष आहेत. अल्पसंख्यांक संस्थांच्या अधिकारावर केवळ कलम ३० चे उल्लंघन न करणारे नियम लागू होतील. शिवाय अल्पसंख्य संस्थांना अनुदान प्राप्त झाले तरी त्यांच्या अल्पसंख्य विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या अधिकारावर बंधने घालता येणार नाहीत.

अल्पसंख्यांक संस्थांनी स्वतःच्या मनाने बिगर अल्पसंख्य विद्यार्थ्यांना प्रवेश देणं आणि त्यांच्यावर सरकारने असे विद्यार्थी लादणं ह्यापैकी पहिला पर्याय योग्य असून दुसरा ह्या संस्थांच्या मुलभूत हक्कांवर अतिक्रमण करणारा आहे.

**३. न्या. रुमा पाल**

बहुमताच्या बहुतेक उत्तरांशी सहमती दर्शवताना न्या. पाल ह्यांनी प्र.१ आणि प्र.८ ह्यांच्या उत्तरांशी असहमती व्यक्त केली. विशेषतः कलम २९(२) हे कलम ३०(१) ला लागू आहे ह्या सबंधी त्यांनी विरोध दर्शविला.

**४. न्या. वरीआवा (न्या.भान)**

मा. न्या. काद्री आणि मा. रुमा पाल ह्यांच्या मतांना विरोध करतांना, न्या. वरीआवा ह्यांनी आपल्या न्या. भान ह्यांच्यातर्फे बहुमताच्या प्रमुख निर्णयाशी सहमती दाखवली.

❑❑❑



# *ब्राह्मोसमाज विरुद्ध प. बंगाल सरकार*
## *शासकीय अनुदान प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक संस्थामधील शिक्षकांच्या नेमणूकी संबंधात शासनाची भूमिका*
*(५ मे २००४ )*

प. बंगाल सरकारच्या, प. बंगाल महाविद्यालयीन शिक्षक कायदा (१९७५) आणि पं.बंगाल महाविद्यालय सेवा आयोग कायदा (१९७८) ह्यांना आव्हान देताना ब्राम्हो समाज शिक्षण संस्थेने असे प्रतिपादन केले की महाविद्यालयीन शिक्षकांच्या नेमणूका महाविद्यालय सेवा आयोगामार्फत करणे घटनाविरोधी आहे. तरी माननीय न्यायालयाने प.बंगाल सरकारला (प्रतिवादी) वरील कायद्यांची अंमलबजावणी करण्यास प्रतिबंध करावा अशी याचिका ब्राह्मोसमाज शिक्षण संस्थेने दाखल केली. ह्याचीच सुनावणी सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश मा.राजेंद्र बाबू व मा. न्यायाधीश जी.पी.माथूर ह्यांच्यापुढे झाली व ह्या खंठपीठाने ५मे २००४ रोजी ह्या याचिकेवर आपला निकाल दिला. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

वर उल्लेखिलेल्या कायद्यानुसार ( कलम ७ ) महाविद्यालयीन शिक्षकांची निवड व नेमणूक ह्यासंबंधी सर्व अधिकार आणि जबाबदारी शासननिर्मित महाविद्यालय सेवा आयोगाकडे सोपवण्यात आले. १९८० सालच्या महविद्यालयीन सेवा आयोग कायद्यानुसार ( महाविद्यालयीन प्राचार्य व अध्यापक निवड पद्धती नियमन ) ह्यानंतर अध्यापक आणि प्राचार्यांच्या नेमणूका होवू लागल्या.

वादी ब्राह्मोसमाज शिक्षण संस्थेने ह्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र. ९६८३-९६८४ (१९८३) दाखल केली. वादींच्या मते भारतीय घटनेच्या कलम २५, २६ आणि ३०(१) मधील तरतुदीनुसार त्यांची संस्था धार्मिक अल्पसंख्य ह्या प्रवर्गात असल्याने अध्यापक आणि प्राचार्य ह्यांच्या नेमणुकीचा हक्क संपूर्णपणे संस्थेचा आहे. त्यामुळे सेवा आयोगामार्फत नेमणूका करण्याची पद्धत घटनाबाह्य आहे. सबब प.बंगाल सरकारला वरील कायद्यांच्या व निवड प्रक्रियेच्या अंमलबजावणीला न्यायालयाने प्रतिबंध करावा.

प्रतिवादी प. बंगाल सरकारतर्फे पुढील प्रमाणे युक्तिवाद करण्यात आला.

- वादी संस्था धार्मिक अल्पसंख्यांक गटात मोडत नाही.
- सरकारी खजिन्यातून वादी संस्थेला निधी (अनुदान) प्राप्त होतो.
- संपूर्ण राज्यभर समान शैक्षणिक गुणवत्ता व पातळी राखण्याची जबाबदारी सरकारची आहे.
- वैधानिकरित्या निर्मित आयोगाच्या शिफारशींचे पालन न करण्याच्या वादींच्या मागणीमुळे योग्य, गुणवत्ताधारक व सर्वोत्तम व्यक्तींना अध्यापक म्हणून नेमणूकीपासून वंचित व्हावे लागेल.

वरील मुद्यांचा विचार करून वादींची याचिका फेटाळून लावली जावी अशी प्रार्थना सरकारतर्फे करण्यात आली.

दोन्ही बाजूंच्या युक्तिवादाचे सखोल परीक्षण करुन न्यायमुर्तींनी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले. न्यायालयाच्या मते ह्या याचिकेच्या संदर्भात पुढील प्रमुख प्रश्नांचा ऊहापोह होणे आवश्यक ठरते.

१) पै फाऊंडेशन विरुद्ध कर्नाटक राज्य ह्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की घटनेच्या कलम १९ (१) (जी) नुसार शिक्षण संस्था स्थापन करणे व त्यांचे व्यवस्थापन करणे हा सर्व नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. घटनेच्या कलम १९ (६) अन्वये सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असे काही वाजवी निर्बंध ह्या हक्कावर घालण्याचा अधिकार शासनाला आहे. त्याचप्रमाणे घटनेच्या कलम २६ (२) प्रमाणे, सार्वजनिक सुव्यवस्था, सामाजिक नैतिकता आणि समाजस्वास्थ्य ह्यांना अकधीन राहून सर्व धर्म आणि पंथ ह्यांना शिक्षणसंस्था स्थापन करणे व त्यांचे व्यवस्थापन करण्याचा हक्क आहे. कलम १९(१) (जी) आणि कलम २६(२) ह्यांच्या एकत्रित अर्थानुसार याचिका कर्त्यांना (ब्राह्मो समाज) शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा हक्क आहे. अर्थातच ब्राह्मो समाज ह्या संस्थेला अल्पसंख्यांक संस्था हा दर्जा आहे की नाही हा मुद्दा ह्या दाव्याच्या संदर्भात गैरलागू ठरतो.

२) ह्या खटल्यातील **प्रमुख प्रश्न नेमणुका करण्याचा शासन अनुदानित संस्थांचा घटनात्मक अधिकार हा आहे** म्हणजेच ह्या बाबतीत सरकारची भूमिका काय आणि महविद्यालय सेवा आयोगामार्फत नेमणुका करणे हा आदेश समाज हिताच्या दृष्टीने वाजवी नियंत्रण ठरु शकते का ह्याचा उहापोह आवश्यक ठरतो.



याचिकादार संस्थेला शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व त्यांचे व्यवस्थापन करण्याचा घटनात्मक हक्क आहे. **सरकारी अनुदान मिळत आहे ह्या एकमेव कारणामुळे शिक्षणसंस्थांच्या स्वायत्ततेवर संपूर्ण निर्बंध घालणे व त्यांना सरकारी मालकीच्या असल्याप्रमाणे वागणुक देणे हे समर्थनीय ठरत नाही.** अर्थात शैक्षणिक दर्जा टिकवण्यासाठी आणि कुव्यवस्थापन टाळण्यासाठी आवश्यक अटी घालणे हा शासनाचा अधिकार आहे. पै.फाऊंडेशनच्या दाव्यात न्यायपीठाने असे म्हटले आहे की

**''व्यावसायिक संस्थांना अनुदान मंजूर करताना शासनाने काही नियम व निर्बंध करणे अनुज्ञेय आहे. अनुदानित महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी शासन, गुणवत्ता, आरक्षण, दुर्बल घटकांना सहाय्य इत्यादींशी संबंधित अटी घालू शकते. ह्या अटींच्या पूर्ततेसाठी कोणती पद्धत वापरावी हे संबंधित विद्यापीठ अथवा सरकारने ठरवायचे आहे.''**

( पै फाऊंडेशन पृष्ठ ५५०, परिच्छेद ७१ )

खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांना अनुदान मंजूर करताना संस्थेवर व्यवस्थापन आणि प्रशासन ह्या संदर्भात शासन काही निर्बंध लावू शकते सरकार आर्थिक भार स्वीकारीत असल्याने, शिक्षणाचा उच्च दर्जा टिकवण्यासाठी, काही अटी घालू शकते. ह्या बरोबरच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ह्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची असते. ह्या कर्मचाऱ्यावर वेतन, भत्ते इत्यादीवर होणारा महसुली खर्च भागवण्यासाठी अनुदान देणाऱ्या अनेक राज्यात ह्या बाबतीत वैधानिक तरतुदी आढळून येतात. अशा कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती ठरवण्याचा अधिकार शासनाला आहे. विशिष्ट पदांसाठी आवश्यक गुणवत्ता निश्चित करण्याचा हक्क मोठ्या प्रमाणात बहुतेक राज्य सरकारांना आहे. केरला एज्युकेशन बिल-१९५७ पासूनच्या अनेक दाव्यात न्यायालयाने सरकारच्या ह्या अधिकाराला पाठिंबा दिला आहे. विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचारी ह्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी निर्धारीत केलेल्या नियम, अटी, नियंत्रण इत्यादींना ह्या न्यायालयाने नेहमीच उचलून धरले आहे. खाजगी व्यवस्थापन सक्षम आणि कार्यक्षम होण्यासाठी आणि समाजाच्या शैक्षणिक गरजांची पूर्ती करण्यासाठी काही कायदे करणे ही शासनाची जबाबदारीच आहे. ह्याचाच अर्थ असा की सुव्यवस्थापनाचा विकास करुन कुव्यवस्थापन टाळण्यासाठी खाजगी संस्थांवर काही निर्बंध अपरिहार्य असतात ज्यायोगे शैक्षणिक सुसंवादित्व प्रस्थापित हेऊ शकते.

**हे सर्व मान्य करुनही एक गोष्ट सरकारने लक्षात घ्यावयास हवी की खाजगी अनुदानित संस्था सरकारच्या मालकीच्या अथवा संपूर्णपणे शासन नियंत्रित होऊ नयेत.** सर्वसाधारणपणे सरकारी अनुदान हे कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते इत्यादींवरील खर्च भागविण्यासाठी दिले जाते. अर्थात विनाअनुदानित संस्थांच्या इतकी स्वायतत्ता अनुदानित संस्थांना मिळू शकत नाही. **तथापि शासकीय अनुदाना व्यतिरिक्त खाजगी अनुदानित संस्थांना मोठ्या प्रमाणावर महसुली व भांडवली खर्च करावा लागतो. त्यामुळे अशा संस्थांना व्यवस्थापन आणि प्रशासनात वाजवी स्वायतत्ता मिळावयास हवी म्हणजेच अशा संस्थांना सरकारचे एक खाते समजून खाजगी व्यवस्थापनात हस्तक्षेप करणे, त्यांचे संपूर्ण नियंत्रण शासनाच्या हाती असणे आणि त्यांच्या सल्लामसलती शिवाय त्यांच्यावर कर्मचारी लादणे हे समर्थनीय नाही.**

( पै फाउंडेशन पृष्ठ ५५०, ५५१ परिच्छेद ७२ )

शिक्षणप्रेमी, समाजहितैषी अशा अनेक व्यक्ती शाळा तसेच व्यावसायिकेतर महाविद्यालये इत्यादींची स्थापना करतात त्यांचा हेतू कितीही उच्च असला तरी शासकीय अनुदान अथवा मदतीशिवाय विद्यार्थीवर्गाच्या दृष्टीने आवश्यक असा संस्थात्मक विकास आणि वृद्धी ह्या संस्थांना शक्य नसते. अशा अनुदानित संस्थांच्याबाबतीतही वर उल्लेख केलेल्या अनुदानित व्यावसायिक संस्थांप्रमाणे, काही नियम, अटी घालण्याचा अधिकार सरकारला आहे. विशेषतः असे अनुदान कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी दिले जात असल्याने, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका, त्यांच्यावरील प्रलंबन, बडतर्फी, शिस्तभंगात्मक कारवाई इत्यादी संबंधी बंधने सरकार घालू शकते. **ह्याचा अर्थ असा की खाजगी विनाअनुदानित संस्थांपेक्षा खाजगी अनुदानित संस्थांची स्वायतत्ता तुलनेने कमी असणं स्वाभाविक आहे.**

( पै फाउंडेशन पृष्ठ ५५१ परिच्छेद ७३ )

**अर्थात असे नियंत्रण अथवा निर्बंध संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनात हस्तक्षेप करु शकणार नाहीत.** पै फाऊंडेशन परीच्छेद ७२ मध्ये हे निःसंदिग्धपणे सांगितले गेले आहे की विशिष्ट गुणवत्ता नेट अथवा सेट निर्धारीत करून महाविद्यालयीन नेमणूकांचे नियमन सरकार करु शकते. **तथापि, खाजगी अनुदानित संस्थांचे स्वातंत्र्य, ही बाब ह्या संस्थांची शैक्षणिक आणि व्यवस्थापकीय स्वायत्तत्ता राखण्याच्या दृष्टीने मुलभूत महत्वाची असून ते अबाधित रहावयास हवे.** आवश्यक गुणवत्ता ठरवण्याचा हक्क सरकारला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने ह्या संदर्भात महाविद्यालयीन शिक्षकांच्या किमान पात्रतेसंबंधी केलेल्या कायद्यानुसार आयोग राष्ट्रीय पात्रता कसोटी (नेट) चे आयोजन करते. ह्या शिवाय ते राज्यालाही राज्यपातळीवर अशा परीक्षेचे (नेट/सेट) चे आयोजन करण्यास अनुमती दिलेली आहे.नेट अथवा सेट अथवा ऊर्त्तीण झालेली व्यक्तीच महाविद्यालयीन शिक्षक होण्यास पात्र असते. हा नियम अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्थांना लागू आहे. म्हणजे नेट अथवा सेट ही आवश्यक पात्रता आहे. **उपलब्ध नेट/सेट धारक उमेदवारांमधून आपल्या निवडीच्या उमेदवाराची नेमणूक करण्याचा हक्क हा संस्थांच्या व्यवस्थापकीय मूलभूत हक्काचा भाग आहे.**

महाविद्यालय सेवा आयोगामार्फत महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्यास राज्यभरात शिक्षणाची समान पातळी राखता येईल असा युक्तीवाद सरकारतर्फे करण्यात आला. आमच्या मते ह्या युक्तिवादाला फारसा अर्थ नाही, कारण शिक्षकांच्या नेट/सेट उत्तीर्णता अटीमुळे समान पातळी आपोआपच गाठली जाते. केवळ अनुदानदाता ह्या भूमिकेतून, अन्य मार्गांनी लादता न येणारे निर्बंध लादणे समर्थनीय ठरत नाही. ह्या न्यायालयाच्या ११ न्यायाधिशांच्या पीठाने पै फाऊंडेशन मध्ये कायद्याची सखोल मीमांसा केली असल्याने त्याचे आणखी विश्लेषण करण्याची आमची इच्छा नाही. दोन्ही बाजू आपापल्या युक्तिवादासाठी पै फाऊंडेशनच्या निकालाचा आधार घेताना दिसून येते.**आम्हाला असे सुचवायचे आहे की ह्या न्यायालयाच्या निष्कर्षांची राज्यसरकारने योग्य ती नोंद घेऊन आपले कायदे, नियम, अटी इत्यादींमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्या.**

आमच्या ह्या भूमिकेवरुन असे स्पष्ट होईल की प्रचलीत नियमांच्या योग्यायोग्यतेचे परीक्षण अनावश्यक आहे. आमच्या आदेशाप्रमाणे नवीन नियम तयार होईपर्यंत ह्या दाव्यात न्यायालयाचे हंगामी आदेश कार्यान्वीत राहतील.

❑ ❑ ❑

# पी.के. इनामदार आणि इतर
# विरुद्ध
# महाराष्ट्र राज्य आणि इतर
## खाजगी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयातील सरकारी कोटा

*खटला क्रमांक : अपील (सिव्हील) ५०४१/२००५*

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मा. आर. सी. लाहोटी ह्यांनी १२ ऑगस्ट २००५ रोजी, अनेक विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर क्रांतीकारी निकाल देऊन खाजगी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयातील सरकारी कोटा रद्द केला. शैक्षणिक विश्वात खळबळ माजवणारा हा निकाल म्हणजे शैक्षणिक दाव्यातील मैलाचा दगड ठरला आहे. ह्या निकालाने खाजगी व्यावसायिक महाविद्यालयांना प्रवेशाबाबत संपूर्ण स्वायत्तता बहाल केली. ह्या निकालात न्यायालयाने असेही नमूद केले की राज्य अथवा केंद्र सरकार ह्या विषयात तपशीलवार कायदा करेपर्यंत, प्रवेश प्रक्रिया आणि शुल्कनिश्चिती ह्या संदर्भातील समित्या कार्यरत रहातील. या याचिकेच्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने अनेक बाबतीत, टी.एम.पै फाऊंडेशनच्या दाव्यात घटनापीठाने दिलेल्या निर्णयाचा संदर्भ दिलेला आढळतो. ह्या शिवाय, इस्लामिक ॲकेडमी विरुद्ध कर्नाटक सरकार, उन्नीकृष्णन् विरुद्ध आंध्रप्रदेश सरकार, सेन्ट स्टीफन कॉलेज विरुद्ध दिल्ली विद्यापीठ, अहमदाबाद सेंट झेव्हीअर्स कॉलेज सोसायटी विरुद्ध गुजराथ सरकार इत्यादी दाव्यांचाही प्रस्तूत निकालपत्रात उल्लेख केलेला आढळतो.

- **पार्श्वभूमी**

सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासात अभावानेच आढळणारी घटना टी.एम.पै.फाऊंडेशन विरुद्ध कर्नाटक राज्य ह्या खटल्यात अनुभवास आली ती म्हणजे ह्या दाव्याच्या निर्णयासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या ११ न्यायमूर्तींचे पीठ नेमण्यात आले. अर्थातच ह्या दाव्याच्या निकालानंतर विविध समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा



निघेल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र काही वेगळेच चित्र समोर आले. एका अनुभवी शिक्षणतज्ज्ञाने असे प्रतिपादन केले की पै फाऊंडेशन मधील न्यायपीठाचा निकाल म्हणजे उदारीकरण, खाजगीकरण, आणि जागतिकीकरण ह्या धोरणातून निर्माण झालेल्या आव्हानांना मिळालेला आंशिक प्रतिसाद होता. अर्थात हा प्रतिसाद कितपत समाधानकारक होता याबद्दल तज्ज्ञांमध्ये मतभेद होते. ह्या संदर्भात असेही प्रतिपादन करण्यात आले की न्यायपीठाच्या निकालाने, जितक्या प्रश्नांची उत्तरे दिली त्यापेक्षा अधिक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण केले. ह्या निर्णयात जी तत्त्वे नमुद केली गेली त्यातील संदिग्धतेमुळे त्याचा वेगवेगळया गटांनी आपल्या सोयीप्रमाणे अर्थ लावला.

परिणामतः पै फाऊंडेशन मधील निकालानंतर ज्या समस्या निर्माण झाल्या त्याविषयी विविध उच्च न्यायालयांमध्ये आणि सर्वोच्च न्यायालयात निरनिराळ्या याचिकांचा महापूर आला. ह्या सर्वाच्या विचारासाठी पै फाऊंडेशनच्या निकालाचा अर्थ लावण्यासाठी एक घटनापीठ नेमले गेले. त्याने १४.८.२००३ रोजी आपला निकाल दिला ह्याचाच उल्लेख इस्लामिक ॲकडमी असा केला जातो. ह्या दाव्यात पै फाऊंडेशन मधील काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण देऊनही अनेक समस्या अनुत्तरीत राहिल्या. यापैकी काही समस्या आणि स्पष्टीकरणाचे काही मुद्दे प्रस्तुत (इनामदार विरुद्ध महाराष्ट्र राज्य ) खटल्यात सात न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे विचारात होते.

- **प्रास्ताविक**

*पी.ए.इनामदार विरुद्ध महराष्ट्र राज्य आणि पुष्पगिरी मेडिकल सोसायटी विरुद्ध केरळा राज्य ह्या खटल्यांच्या सुनावणीसाठी भारताचे प्रमुख न्यायाधिशांच्या आदेशानुसार सात न्यायमुर्तींच्या खंडपीठाची नेमणूक करण्यात आली. ह्यातील समस्यांचा विचार करुन निर्णय जाहीर करण्यापूर्वी ह्या खंडपीठाने काही प्राथमिक निरिक्षणे पुढीलप्रमाणे नोंदवली आहेत. त्यावरुन त्यांच्यापुढे असलेल्या विवादपूर्ण मुद्द्यांचा आवाका लक्षात येतो.*

- सर्वप्रथम आम्ही असे नमुद करतो की पै फाऊंडेशन पुढे आलेल्या अनेकविध समस्यांवर आमचे स्वतंत्र मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी नाही.
- पै फाऊंडेशन खटल्यात ११ न्यायमूर्तींच्या न्यायपीठाने दिलेले काही निर्णय, आम्हाला अमान्य असले तरी, आमच्यावर बंधनकारक आहेत.

- पै फाउंडेशनमधील बहुमताच्या निर्णयाशी विसंगत असे स्पष्टीकरण इस्लामिक ॲकॅडमीने दिलेले आहेत का ह्याची छाननी करणे ही आमची प्रमुख जबाबदारी आहे.
- अशी विसंगती आढळल्यास इस्लामिक ॲकॅडमीचे स्पष्टीकरण हे पै फाऊंडेशन मध्ये निर्धारित केलेल्या कायद्याविरुद्ध मानून आम्ही ते मत फेटाळून लावू.
- पै फाऊंडेशन मधील काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण करण्याच्या संदर्भात इस्लामिक ॲकॅडमीच्या घटनापीठाने पुढील दोन समित्या नेमण्याची शिफारस केली.

१. शुल्क निर्धारण समिती

२. प्रवेश परीक्षा निरिक्षण समिती

**सादरीकरण**

पै फाऊंडेशन मधील विवाद मुद्द्यांचे अर्थ लावण्यासाठी व स्पष्टीकरणासाठी नेमलेल्या खंडपीठाने ( इस्लामिक ॲकॅडमी ) दिलेल्या निर्णयाची झळ लागलेल्या व्यक्तींनी केलेल्या याचिकांचा विचार करताना असे स्पष्ट होते की ह्या सर्वांचे वर्गीकरण व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या विनाअनुदानित अल्पसंख्यांक आणि अल्पसंख्येतर शिक्षण संस्था ह्या एका गटात करता येते.

आमच्यापुढे निर्णयासाठी पुढील तीन समस्या ठेवण्यात आलेल्या आहेत.

१. विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण संस्थांतील प्रवेश विषयक कोटा निश्चिती

२. वरील महविद्यालयातील प्रवेशासाठी घेतली जाणारी प्रवेश परीक्षा म्हणजे ही प्रवेश परीक्षा घेण्याचा अधिकार कोणाचा ?

३. शुल्क रचना

वार उल्लेख केलेल्या समस्यांविषयक आमचे विचार आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या वरील आदेशांच्या मर्यादेत मांडणार आहोत. आमच्या मते आमच्यासमोर असलेल्या याचिकांतून पुढील प्रश्नांची चर्चा अभिप्रेत आहे.



१. विनाअनुदानित ( अल्पसंख्य व इतर ) शिक्षणसंस्थांतील प्रवेशनियमनाच्या सरकारी हस्तक्षेपाची व्याप्ती किती ? शासन आपले आरक्षणाचे धोरण ह्या संस्थांवर लादू शकते का आणि त्यासाठी ह्या संस्थांमधील प्रवेशात सरकार आपला कोटा ठरवू शकते का ?

२. विनाअनुदानित शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश पद्धती कशी असावी. ह्या संस्थांनी आपली प्रवेश पद्धती स्वतंत्रपणे ठरवण्याचा हक्क आहे की इस्लामिक ॲकॅडमीच्या आदेशानुसार प्रवेशासाठी राज्यशासन अथवा अशा संस्थांची संघटना ह्यानी प्रवेशपरीक्षांचे आयोजन करुन त्यातून निवडलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देणे बंधनकारक आहे. पै फाऊंडेशनने निर्धारित केलेल्या कायद्याच्या चौकटीत इस्लामिक ॲकॅडमीने दिलेला निर्णय बसू शकतो का ?

३. विद्यार्थ्यांनी किती शुल्क भरावे या संबंधी इस्लामिक ॲकॅडमीने काही मार्गदर्शक तत्त्वे लागू करावयास हवी होती का ?

४. इस्लामिक ॲकॅडमीने दिलेल्या निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया आणि शुल्क रचना ह्यासाठी स्थापावयाच्या समित्यांना ह्या संबधी सर्वाधिकार देणे योग्य आहे का ?

वरील प्रश्नांच्या विवेचनासाठी पै फाऊंडेशने केलेल्या पाच वर्गीकरणांपैकी क्रमांक ३ व ५ आणि उपस्थित केलेल्या ११ प्रश्नांपैकी प्रश्न क्रमांक ३(ब), ४, ५ (अ,ब,क) आणि ९ ह्यांच्याशी संबंधित आहेत.

ह्या खटल्याच्या सुनावणी दरम्यान न्यायालयापुढे अनेक तज्ज्ञ आणि अनुभवी वकीलांनी विविध कायद्यांच्या आणि पूर्व निकालांच्या आधारे विविध मतप्रवाह, युक्तीवाद मांडले.

### ❖ वादींची बाजू

याचिकादारांतर्फे बाजू मांडताना ज्येष्ठ ॲडव्होकेट हरीष साळवे ह्यांनी असे प्रतिपादन केले की, पै फाऊंडेशन मधील विविध निकालपत्रांचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की, प्रवेश नियमन आणि शुल्क निर्धारण त्यासाठी कायमस्वरुपी समित्यांच्या स्थापनेसंबंधी इस्लामीक ॲकॅडेमीचे आदेश पै फाऊंडेशन मधील निकालाशी विसंगत आहेत. माननीय वकील महोदयांनी असे स्पष्ट केले की प्रवेश आणि शुल्क ह्याच्यावर राज्यांचे नियंत्रण म्हणजे शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण होय. उन्नीकृष्णन् खटल्यातही अशा प्रकारच्या समित्यांची निर्मिती सुचवली होती व ती पै फाऊंडेशनने फेटाळली होती.

इस्लामीक ॲकॅडमीत तशाच समित्यांची पुनर्निमीती सुचवली असल्याने ती पै फाऊंडेशनच्या कायद्याविरोधी आहे.

कर्नाटक वैद्यकीय महाविद्यालय संघटनेमार्फत प्रख्यात कायदेतज्ज्ञ श्री. अशोक देसाई ह्यांनी युक्तीवाद केला. त्यांनी इस्लामिक ॲकॅडमीच्या प्रवेश प्रक्रीया (सरकारी कोटा) व शुल्क निश्चीती ह्यासाठी समित्या नेमण्याच्या आदेशाबद्दल शंका उपस्थित करुन अशी समिती ही खाजगी शिक्षण संस्थांच्या घटनात्मक मुलभूत हक्कावरील अतिक्रमण आहे असे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, विनाअनुदानित शिक्षणसंस्थांना प्रवेश आणि शुल्क ह्या संबंधात संपूर्ण स्वायत्तता असावी. ह्या पै फाऊंडेशनच्या निकालाकडे इस्लामिक ॲकॅडमीने पूर्ण दुर्लक्ष केले आहे.

ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ श्री. एफ. एस.नरीमन ह्यांनी वरील सर्व युक्तीवादांना पाठींबा देऊन असे मत व्यक्त केले की पै फाऊंडेशनने कुठेही सरकारी कोट्याचा उल्लेख केलेला नसताना इस्लामिक ॲकॅडमीत तो देणं हे अकरा न्यायमुर्तींच्या न्यायपीठाने व्यक्त केलेल्या मताविरोधी आहे. सेंट स्टीफन खटल्यातील व्यवस्थापन आणि शासन ह्यांच्यामधील ५०/५० टक्के कोटा निर्धारण फक्त अनुदानित शिक्षण संस्थांशी संबंधीत होते. पै फाऊंडेशनमध्ये विनाअनुदानित संस्थांच्या कोट्याबाबत उल्लेखही केलेला नसताना इस्लामिक ॲकॅडमीने तसे आदेश देणे विस्तृत न्यायपीठाच्या मताशी विसंगत आहे. असे ही नमुद केले गेले की खाजगी विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या स्वायत्ततेचा आदर केलाच पाहिजे आणि त्यासाठी, नफाखोरी आणि कॅपिटेशन फी ह्यावरील नियंत्रण वगळून, शुल्क रचनेचा अधिकार हा संपूर्णपणे ह्या संस्थांचा हक्क समजला जावयास हवा. ह्याबाबतीत शासनाला कोणताही अधिकार असू शकत नाही. खाजगी शिक्षण संस्थांच्या प्रशासकीय स्वायत्ततेच्या संकल्पनेत, प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची निवड करणे आणि वाजवी शुल्क आकारणे, ह्या दोन स्वातंत्र्यांचा प्रामुख्याने अंतर्भाव आहे. शुल्क रचनेत कॅपिटेशन फी असू नये ह्या बद्दल दुमत असूच शकत नाही. *कॅपिटेशन फी आकारणे म्हणजे, संस्थेचा महसूली आणि भांडवली खर्च अधिक वाजवी आधिक्य ह्या पेक्षा अधिक शुल्क आकारणी होय.* अनुदानित तसेच विनाअनुदानित संस्थांच्या महसूली आणि भांडवली खर्चाची पडताळणी सरकार करु शकते पण त्यामुळे शासनाला प्रवेश प्रक्रिया आणि शुल्क निर्धारण करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.



प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ डॉ. राजीव धवन ह्यांनी इस्लामिक ॲकॅडमीच्या आदेशा विरुद्ध हल्ला चढवताना महाराष्ट्र सरकारचा १३.०२.२००३ चा आदेश हे विनाअनुदानित संस्थांच्या हक्कावरील अतिक्रमण आहे असे प्रतिपादन केले कारण ह्या द्वारे विनाअनुदानित अल्प संख्येतर संस्थांच्या व्यवस्थापन कोट्यावरही आरक्षण सक्तीचे केले गेले. त्यांनी पुढे असे मत व्यक्त केले की पै फाऊंडेशनने विनाअनुदानित संस्थांना जास्तीत जास्त स्वायत्तता देण्यास पाठींबा दिला आहे. फक्त त्यांनी प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी आणि कॅपिटेशन फी आकारु नये एवढीच नियंत्रणे पाळावित. त्यांनी हे दाखवून दिले की समितीची स्थापना अथवा सरकारला कोटा ह्या बाबतीत पै फाऊंडेशन मध्ये कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष उल्लेख आढळून येत नाही.

सोल दंत महाविद्यालयाच्या बाजूने ज्येष्ठ वकील श्री. ललीत ह्यांनी युक्तीवाद सादर करतांना वरील सर्वांच्या युक्तीवादाचा पाठपुरावा केला आणि त्रिस्तरीय शुल्क रचना सुचवली ज्यायोगे गुणवत्ताधारक पण गरीब विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळू शकेल असा दावा केला. त्यांनी पुढे अशी विनंती केली की मुंबई उच्च न्यायालयाचा सर्व विद्यार्थ्यांना एक शुल्क निर्धारित करणारा दि. २३ ऑगस्ट २००३ चा आदेश रद्द करुन अल्पसंख्य शिक्षण संस्थांना त्याचे मुलभूत हक्क प्रदान करुन वरील त्रिस्तरीय शुल्क रचना लागू करण्यास परवानगी द्यावी.

### ❖ प्रतिवाद

प्रतिवादी विविध राज्य सरकारांतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाचे नेतृत्व केरळ शासनातर्फे बाजू मांडणारे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ श्री. के. के. वेणुगोपाळ ह्यांनी केले. ह्या ठिकाणी हे नमुद करावयास हवे की पै फाऊंडेशन आणि इस्लामिक ॲकॅडमी ह्यातील कोर्टाच्या निकालपत्रानंतर केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडू ह्या राज्याच्या विधी मंडळानी कायदे करुन अल्पसंख्य तसेच बिगर अल्पसंख्य अनुदानित तसेच विनाअनुदानित, खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया आणि शुल्क ह्यांचे नियंत्रण करण्यास सुरुवात केली.

केरळ सरकारतर्फे असे सांगण्यात आले की खाजगी व्यावसायिक महाविद्यालयातील केवळ २५% जागा केंद्रीय प्रवेश परीक्षेमार्फत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. आणि उरलेल्या ७५% जागा भरण्याचा अधिकार महाविद्यालयीन व्यवस्थापनाला बहाल करण्यात आला आहे. पै फाऊंडेशनच्या बहुमतीय निकालपत्रातील ६७ ते ७० परीच्छेदांचे शीर्षक खाजगी

विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालये असे आहे. ह्यापैकी परीच्छेद क्रमांक ६८चा अर्थ कर्नाटक आणि केरळ उच्च न्यायालयानी वेगवेगळा लावल्याने निर्माण झालेली विसंगती ७ न्यायमुर्तींच्या ह्या खंडपीठाने दूर करावी अशी विनंती करण्यात आली.

खाजगी व्यवस्थापन आणि शासन ह्यामध्ये कोटा निश्चित करणे आणि नफेखोरीला आळा घालण्यासाठी शुल्क निश्चिती ह्यासंबंधी केलेल्या तरतुदींचे समर्थन करतांना श्री. वेणुगोपाळ ह्यांनी विद्यार्थ्यांचे शोषण करणाऱ्या खाजगी व्यवस्थापनांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकला. नफेखोरी, कॅपिटेशन फी आणि शिक्षणाचे व्यापारीकरण ह्या प्रवृत्तींची निर्भत्सना पै फाऊंडेशन तसेच इस्लामिक ॲकॅडमी ह्या दोन्ही निकालपत्रात केली आहे. न्यायालयाच्या मतांची अंमलबजावणी करण्यासाठीच केरळ सरकारने प्रवेश आणि शुल्क ह्यांचे नियंत्रण करणारे कायदे केले आहेत. केरळ उच्च न्यायालयाने तात्पुरते म्हणून १.५ लाख वार्षिक शुल्क ठरवले तर केरळ सरकारने ते १.७६ लाख निश्चित केले. पुष्पगिरी वैद्यकीय महाविद्यालयाने स्वतःच मान्य केले की त्यांनी भिन्न विद्यार्थ्यांना ४.३८ लाख आणि २२ लाख असे शुल्क आकारले. २२ लाख ही रक्कम संपूर्ण कोर्सची आहे हे महाविद्यालयाचे कथन विश्वसनीय नाही कारण फक्त काही विद्यार्थ्यांकडूनच ही रक्कम वसूल केली गेली. अशा अपप्रवृत्तींना आळा घालण्यासाठीच व विद्यार्थी आणि पालक ह्यांचे शोषण थांबविण्यासाठी सरकारला प्रवेश आणि शुल्क निश्चिती समिती गठीत करणे भाग पडले. श्री. वेणुगोपाळ ह्यांनी असा मुद्दा मांडला की इस्लामिक ॲकॅडमीच्या निकालपत्राची योग्यायोग्यता ठरवण्याचा प्रश्न प्रस्तूत पीठासमोर नाही. तर पै फाऊंडेशनचे निकालपत्र हे ११ न्यायमुर्तींच्या विस्तृत न्यायपीठाचे असल्याने त्याची योग्यायोग्यता ठरविण्याचा हक्क ह्या खंडपीठाला नाही. त्यांनी पुढे असं स्पष्ट केलं की परिच्छेद ५९ आणि ६८ मध्ये काही विसंगती असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी इस्लामिक ॲकॅडमीच्या न्यायमुर्तींच्या खंडपीठाची रचना करण्यात आली. सबब जर इस्लामिक ॲकॅडमींनी पै फाऊंडेशनमधील विसंगतीचे स्विकारणीय व वाजवी स्पष्टीकरण केले असेल तर ह्या न्यायपीठाचे त्याच्याऐवजी वेगळे स्पष्टीकरण करु नये.

स्थानिक गरजा लक्षात घेऊन कोटा ठरवावा असा उल्लेख पै फाऊंडेशन निकालपत्रातील पॅरा ६८ मध्ये आढळतो शिवाय पॅरा ६८ आणि ६९ ह्यांचा एकत्रित विचार केल्यास पै फाऊंडेशनने, प्रवेश आणि शुल्क ह्यांच्या नियमनासाठी आणि न्यून



गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना प्रवेश, कॅपिटेशन फी, नफाखोरी इत्यादी अपप्रवृत्तींना तसेच शिक्षणाच्या बाजारीकरणाला रोखण्यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याची शिफारस केली आहे.

कर्नाटक सरकारची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील श्री.अंध्यार्जुना ह्यांनी इस्लामिक ॲकॅडमीच्या निर्णयाला पाठिंबा दिला आणि प्रवेश आणि शुल्क निश्चिती ह्यांच्या नियमनासाठी दोन समित्यांची स्थापना ही अत्यंत योग्य गोष्ट असल्याचे आग्रहाने प्रतिपादन केले. त्यांनी असे स्पष्ट केले की कर्नाटक सरकारने व्यवस्थापनाला दिलेल्या जागांवर आरक्षण धोरणाचा आग्रह धरलेला नाही.

ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ श्री.पी.पी. राव ह्यांनी तामीळनाडू सरकारचे प्रतिनिधीत्व करताना इस्लामिक ॲकॅडमीच्या आदेशांना पाठींबा दिला आणि असे स्पष्ट केले की अल्पसंख्य शिक्षणसंस्थांमध्ये जातीधिष्ठीत आरक्षण लादले जाणार नाही. घटनेच्या ५१अे(१) कलमाचा आधार घेऊन त्यांनी घटनेतील मूलभूत कर्तव्यांचा उल्लेख केला. ह्यामध्ये देशाला यशाच्या व प्रयत्नांच्या उच्च पातळीवर नेणे हे नागरिकांचे वैयक्तिक आणि सामुहीक कर्तव्य असल्याचे प्रतिपादन केले आहे. ह्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जातो हे बघण्याची जबाबदारी शासनावर आहे. आत्तापर्यंत सर्वच न्यायालयांनी गुणवत्ता हा प्रवेशाचा महत्त्वाचा निकष असल्याचे प्रतिपादन केलेले आढळते.

सारांश, वादी आणि प्रतिवादी दोहोंतर्फे विविध ज्येष्ठ आणि अनुभवी कायदेतज्ज्ञांनी आपापल्या मतांचे समर्थन करताना कायदा, घटनात्मक तरतुदी इत्यादींच्या सहाय्याने अभ्यासपूर्ण युक्तीवाद केले. दोन्ही बाजूकडून पै फाऊंडेशनच्या निकालपत्रातील अनेक मुद्द्यांचा आपल्याला सोयीस्कर असा अर्थ लावला गेला. वादींच्याबाजूने, सरकारी कोटा, आरक्षण, प्रवेश आणि शुल्करचना समिती इत्यादीवर टीका करताना खाजगी शिक्षण संस्थांच्या स्वयत्ततेच्या मुद्द्यावर भर दिला गेला तर प्रतिवादींतर्फे राष्ट्रीय हीत, विद्यार्थी व पालकांचे शोषण, गुणवत्तेकडे दुर्लक्ष, नफेखोरी, इत्यादी मुद्यांकडे लक्ष वेधले गेले आणि शिक्षणाचा स्तर उंचवण्यासाठी शासनाला शैश्रणिक क्षेत्रातील अपप्रवृत्ती टाळण्यासाठी खाजगी संस्थांचे नियमन करावेच लागेल असा युक्तीवाद केला गेला.

• **निकालपत्र**

पै फाऊंडेशन आणि इस्लामिक ॲकॅडमी तसेच वादी आणि प्रतिवादी ह्यांच्यातर्फे सादर केलेले युक्तीवाद ह्या सगळ्यांचा सखोल विचार करुन खंडपीठाने सुरुवातीला उल्लेख केलेल्या चार प्रश्नांची उत्तरे आपल्या निकालपत्रात पुढील प्रमाणे मांडली.

*प्रश्न १ : विनाअनुदानीत शिक्षण संस्था - सरकारी कोटा आणि सरकारी आरक्षण लागू करण्याबाबत*

अ) **अल्पसंख्य संस्था**

केरळ एज्युकेशन बिलाप्रमाणे अल्पसंख्या शैक्षणिक संस्थांची तीन गटात केलेली वर्गवारी आजही लागू असून पै फाऊंडेशनच्या न्यायपीठाने त्याला मान्यता दिली आहे ह्या संदर्भात पै फाऊंडेशनने पुढील मत मांडले.

१) विनाअनुदानित आणि विनामान्यताप्राप्त अल्पसंख्य शैक्षणिक संस्थांना घटनेच्या ३० (१) कलमाप्रमाणे पुढील अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

- विद्यार्थ्यांना प्रवेश देणे
- वाजवी शुल्क निर्धारण
- व्यवस्थापन मंडळाचे गठन
- शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमणे
- कर्तव्यकसूर कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कारवाई.

सरकारकडून अनुदान अथवा मान्यता न मागणाऱ्या संस्थांना वरील बाबतीत संपूर्ण स्वायत्तता असेल. राष्ट्रीय हित, सार्वजनिक सुरक्षा, राष्ट्रीय एकता, राष्ट्रीय सुरक्षा, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे शोषण अशा बाबी वगळून इतर बाबतीत शासन ह्या संस्थांच्या कामकाजात हस्तक्षेप करु शकत नाही.

राष्ट्रीय कायद्याविरुद्ध अशा संस्थांना कोणतेही कार्य करता येणार नाही. त्यांची इच्छा असल्यास सर्व जागा ह्या संस्थांना अल्पसंख्यांकांमधून भरता येतील.

२) विनाअनुदानित पण मान्यता अथवा संलग्नता मागणाऱ्या संस्था - अशा संस्थांना त्या केवळ अल्पसंख्य आहेत ह्या कारणास्तव मान्यता अथवा संलग्नता नाकारता येणार नाही. अर्थात ह्यासाठी काही नियम व अटी बंधनकारक असतील. ह्यात गुणवत्ता, शैक्षणिक उच्च पातळी, सुयोग्य व्यवस्थापन, शिक्षक व इतर



कर्मचाऱ्यांची आवश्यक पात्रता, अभ्यासक्रम, पायाभूत सुविधा इत्यादींचा समावेश होतो. तथापि दैनंदिन व्यवस्थापनात सरकारचा हस्तक्षेप असणार नाही. म्हणजे विद्यार्थी प्रवेश, शुल्क निश्चिती, कर्मचाऱ्यांच्या नेमणुका इत्यादी बाबतीत ह्या संस्थांना पूर्ण स्वायत्तता असेल .

**३) अनुदानित अल्पसंख्य संस्था**

अनुदान प्राप्त होणाऱ्या संस्थांच्या बाबतीत अनुदान ज्यासाठी मंजूर झाले आहे त्यासाठीच वापरले जाण्याची अट असणे योग्य ठरते असे नमूद करुन पै फाऊंडेशनने असे प्रतिपादन केले की अनुदानित संस्थांचा विषय ह्या न्यायपीठाकडे नसल्याने ह्या दिवशी आम्ही आणखी मत प्रदर्शित न करता तो विषय इथेच संपवतो.

व्यवस्थापन आणि सरकार ह्यांच्यात जागा वाटपाच्या बाबतीत (कोटा ) आणि सरकारी आरक्षण धोरण लदण्याबाबत आमच्या मते अल्पसंख्य आणि बिगर अल्पसंख्या विनाअनुदानित संस्थांमध्ये फारसा फरक नाही ह्या विषयी याचिकादारांतर्फे केलेल्या युक्तीवादात तथ्य आहे असे आम्ही मानतो. म्हणजे विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये सरकारी कोटा मागण्याचा अथवा आरक्षण धोरण राबवण्याचा कोणताही अधिकार शासनाला नाही.

आमच्या मते पै फाऊंडेशन अथवा केरला एज्युकेशन बिल ह्यामध्ये कुठेही सरकारी कोटा अथवा आरक्षण राबवण्याची सक्ती करण्यास अनुमती दिलेली नाही. अशा प्रकारे शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करण्यास पै फाऊंडेशनने मान्यता दिलेली नाही.

सारांश, पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत आमचा असा निर्णय आहे की, विनाअनुदानित खाजगी शिक्षणसंस्थांमध्ये अल्पसंख्या, बिगरअल्पसंख्या आरक्षणाचे धोरण लादण्याचा अथवा जागा वाटपाचा (कोटा) कोणताही अधिकार शासनाला नाही.

*प्रश्न २ : विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेशप्रक्रिया*

विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे शिक्षणसंस्थांची स्थापना आणि व्यवस्थापन ह्या मूलभूत हक्कांचा भाग असल्याने विनाअनुदानित अल्पसंख्य संस्थांच्या बाबतीत शासन हस्तक्षेप करु शकत नाही. पदवीपूर्व, पदवीपर्यंत ह्या संस्थांना संपूर्ण स्वायत्तता असते.

पदव्युत्तर, तांत्रिक तसेच व्यावसायिक शिक्षणाच्या बाबतीत वेगळा विचार करावा लागतो कारण त्यासाठी कोणत्याही संस्थेला मान्यता आणि संलग्नता आवश्यक

असते.  शिक्षणाची उच्च गुणवत्ताही या पातळीवर अनिवार्य घटक असतो ह्या उद्दीष्टाच्या पूर्तीसाठी शासन हस्तक्षेप करु शकते.  एवढेच नव्हे तर असा हस्तक्षेप काही वेळा राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आवश्यक असतो.  संस्थेचा दर्जा कोणताही असला ( अल्पसंख्य वा इतर ) प्रवेशाच्या बाबतीत गुणवत्ता प्राधान्य आणि पारदर्शकता अनिवार्य आहे.  पै फाऊंडेशन मध्ये हे स्पष्ट केले आहे की अल्पसंख्य दर्जा हा प्रत्येक राज्यापुरता ठरतो. अर्थात एका राज्यात अल्पसंख्य दर्जा असलेली संख्या ( धर्म अथवा भाषेवर आधारित ) दुसऱ्या राज्यात अल्पसंख्य असेलच असे नाही अशा परिस्थितीत अल्पसंख्य नसलेल्या इतर राज्यातील विद्यार्थ्यांना अल्पसंख्या हक्क प्राप्त होणार नाही. त्यांना प्रवेश देताना त्यांचा समावेश बिगर अल्पसंख्यांमध्ये होईल आणि असे प्रवेश मर्यादित प्रमाणात द्यावे लागतील.

एखाद्या विशिष्ट विद्या शाखेचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या अनेक संस्था एका राज्यात असतात अशा वेळी त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांना विविध संस्थांचें प्रवेश अर्ज खरिदणे, तसेच त्यांच्या वेगवेगळ्या प्रवेश परीक्षा देणे भाग पडते. त्यामुळे  विद्यार्थ्यांना गैरसोय व अनावश्यक खर्च सहन करावा लागतो.  अशा परिस्थितीत एकच प्रवेश परीक्षा घेणे सर्वांच्याच हिताचे व सोयीचे ठरते.  अशी परीक्षा शासन, त्यांचा प्रतिनिधी वा शैक्षणिक संस्थांचा गट यापैकी कोणीही घेऊ शकेल म्हणजेच ( सीईटी ) प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्यास मदत करते.  अशा प्रकारची एक खिडकी योजना अल्पसंख्य संस्थांच्या अधिकारावर आक्रमण करीत नाही.  कारण प्रवेश परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमधून गुणवत्ता क्रम न बदलता, विद्यार्थी निवडीचे स्वातंत्र्य या संस्थांना आहे.  अल्पसंख्येतर विनाअनुदानित संस्थांनाही हेच तत्त्व लागू होते.

*प्रश्न ३ : शुल्क नियंत्रण*

वाजवी शुल्क आकारणी हे देखील शिक्षणसंस्थांच्या मुलभूत हक्कांचा भाग आहे. कॅपिटेशन फी आणि नफाखोरी टाळून शुल्क निश्चितीचा अधिकार पै फाउंडेशनने  मान्य केला आहे.  या संदर्भात पै फाऊंडेशनने प्रश्न ५ () च्या उत्तरात असे  मत व्यक्त केले आहे की

धंदा आणि व्यवसायात दृष्टीकोनात्मक भेद आहे.  धंद्याचे एकमेव उद्दीष्ट म्हणजे कमाल नफा मिळवणे तर व्यवसायात नफ्यापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले जाते. देणग्या देऊन व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवणारा विद्यार्थी व्यावसायिक



गुणवत्ता प्राप्त झाल्यावर समाजहिताहून स्वहिताला, प्राधान्य देईल व केवळ पैशाच्या मागे लागेल.  नफेखोरी म्हणजे शिक्षणाचे उघड बाजारीकरण होय.  शिक्षणक्षेत्रातील अनिष्ट प्रवृत्ती रोखण्यासाठी प्रवेश अशा रीतीने नियमीत करावयास हवेत की गुणवत्ता ही प्रवेशाची एकमेव कसोटी असेल.

सारांश प्रश्न तीनच्या उत्तरात आम्ही असे नमुद करतो की शुल्करचना ठरवण्याचा संस्थांचा हक्क मान्य करुनही नफेखोरीला प्रतिबंध करण्यासाठी त्यावर जरुर निर्बंध घालणे न्याय्य ठरते.

*प्र. ४  इस्लामीक ॲकॅडमीच्या निकालपत्राद्वारे घटीत केलेल्या समित्या.*

इस्लामिक ॲकॅडेमीच्या प्रवेश आणि शुल्क निर्धारण अशा दोन समित्या स्थापण्याच्या निर्णयावर वादींच्या वकीलांनी जोरदार टीका केली. ह्या संदर्भात पै फाऊंडेशनच्या निकालपत्रातील परिच्छेद ३५, ३६, ३७, ३८, ४५, आणि १६१ (प्र. ९ चे उत्तर) ह्या कडे लक्ष वेधून असे प्रतिपादन करण्यात आले की पै फाऊंडेशनने उन्नीकृष्णन् खटल्यातील अशाच प्रकारची योजना नाकारली आहे.  वादींच्या वकीलांनी समित्या  नेमण्याला विरोध करतांना असे स्पष्ट केले की शिक्षणाचे व्यापारीकरण रोखण्यासाठी काही बंधने आवश्यकच आहेत.  पण त्यासाठी इस्लामिक  ॲकॅडमीने सुचवलेल्या समित्या हा योग्य उपाय नाही त्याऐवजी मान्यता अथवा/आणि संलग्नतेच्या अटींच्या स्वरुपात असे नियंत्रण शक्य आणि समर्थनीय आहे.  असे उपााय म्हणजे अल्पसंख्यांक तसेच इतर शिक्षण संस्थांच्या अधिकारावर आक्रमण ठरत नाही असे वादींच्या वकीलांनी निःसंदिग्धपणे स्पष्ट केले.

*प्र. ४ च्या उत्तरात आम्ही असा निर्णय देतो की प्रवेश आणि शुल्क निश्चिती संदर्भात इस्लामिक ॲकॅडमीने सुचवलेल्या दोन समित्या पै फाऊंडेशनच्या कायद्याच्या मर्यादेबाहेर नाहीत.*

सारांश ह्या खंडपीठाने सरकारचा कोटा आणि आरक्षण रद्दबातल ठरवले तर समित्यांची स्थापना कायद्याच्या मर्यादेत असल्याचे मत व्यक्त केले. खंडपीडाने पुढे असे प्रतिपादन केले की पै फाउंडेशनच्या निकालात काही ठीकाण अंतर्विरोध व विसंगती आढळून येते.  त्याचे निराकरण करण्यासाठी पै फाऊंडेशनहून अधिक मोठ्या (११ पेक्षा जास्त) न्यायपीठाची गरज आहे.

❑❑❑

# शिक्षणाचे खाजगीकरण : काळाची गरज

आर्थिक विकासाच्या प्रक्रीयेत शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे ह्या बद्दल विविध राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विचारसरणींच्या समर्थकांमध्ये एकमत आढळून येते. पण शिक्षणाची जबाबदारी कोणाची ह्या बाबतीत मतभिन्नता आहे. काहींच्या मते ही जबाबदारी शासनाची आहे तर काहींच्या मते समाजाची. भारतासारख्या संघराज्यीय (Federal) प्रणालीत केंद्र सरकार की राज्य सरकार हा देखील वादाचा मुद्दा होऊ शकतो.

१९९१ सालच्या नवीन आर्थिक धोरणाचे शिल्पकार असलेले तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग हे आज देशाचे पंतप्रधान आहेत अर्थातच उदारीकरण, खाजगीकरण आणि वैश्वीकरण हे त्रिसूत्री आर्थिक धोरण योग्य मार्गाने पूर्णत्वाला नेण्याची त्यांची इच्छा असणे स्वाभाविक आहे. पंतप्रधानकीचे एक वर्ष उलटल्यावर आलेल्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ऑगस्ट, १६, २००५ रोजी मॅकीन्से (Mekinesy) च्या रंजन गुप्ता ह्यांना दिलेल्या मुलाखतीत माननीय पंतप्रधानांनी पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, परकीय गुंतवणूक, रोजगार निर्मिती, दरिद्रय निर्मूलन, मनुष्यबल विकास, इत्यादी विविध विषयावर आपले विचार मांडले.

"…… But that also means that we must ensure that our system of general education and technical education are in line with job requirements of more modern manufacturing and more modern service sector……

The working force must have skills which will fit the kind of jobs which will be in demand"

सारांश, पंतप्रधानांच्या मते उत्पादन आणि सेवा क्षेत्राला आवश्यक असणारा श्रमपुरवठा निर्माण करण्यासाठी आपली सर्वसाधारण आणि तांत्रिक शिक्षणाची पद्धत बदलण्याची गरज आहे.

ह्या मुलाखतीत पंतप्रधान पुढे असं म्हणाले, ''शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन महत्त्वाच्या बाबींकडे पाहिजे तेवढं लक्ष दिलं गेलेलं नाही. ह्या दृष्टीने आम्ही आमच्या एक वर्षाच्या कालावधीत प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रीत केलं आणि मला खात्री आहे की पुढील चारपाच वर्षात ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना आणि खास



करुन दुर्लक्षित घटक आणि मुली ह्यांना प्राथमिक शिक्षण प्राप्त होईल. … पण अशा सोयी माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत उपलब्ध करुन देणं ही मोठी समस्या मला चिंतीत करते. उच्च शिक्षण आणि संशोधन ह्यांचा विचार करण्यासाठी नुकताच डॉ. सॅम पित्रोडांच्या नेतृत्वाखाली ज्ञानसाधना आयोग स्थापन करण्यात आला आहे. शिक्षणाची गुणवत्ता सर्वच पातळ्यांवर सुधारण्यावर माझा भर आहे, कारण माझ्या मते जनतेला सक्षम बनवण्यासाठी शिक्षण आणि आरोग्य ह्या दोन्ही क्षेत्रात मोठया प्रमाणावर गुंतवणुकीची गरज आहे.''

शिक्षण पद्धतीचा विचार करताना प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण आणि संशोधन ह्या सर्वच बाबींचा विचार करणे आवश्यक ठरते.

असा विचार करताना शिक्षणतज्ज्ञ, राजनीतीज्ञ, समाजशास्त्रज्ञ इत्यादी सर्वांच्या मते सध्याच्या शिक्षण पद्धतीत सर्वच पातळ्यांवर आमुलाग्र बदल होणे अत्यावश्यक आहे ह्या संदर्भात केंद्र सरकारने नुकत्याच नेमलेल्या भारतीय ज्ञानसाधना आयोगाचे (Knowledge commission) नेतृत्व करणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तंत्रज्ञ सॅम पित्रोडा ह्यांनी 'ज्ञानाच्या अर्थकारणात भारतीयाना संधी' ह्या विषयावरील दिल्ली आय.आय.टी.त झालेल्या परीसंवादात असे मत व्यक्त केले की,

*''विद्यमान गुणवत्तेच्या कसोटीवर ८० टक्के महाविद्यालयीन शिक्षण निरर्थक ठरते आहे कारण भारतात शिकवल्या जाणाऱ्या विज्ञान, भौतिकशास्त्र आणि अंकगणितात आधुनिकतेचा अभाव आहे. प्रयोगशाळांमध्ये वाढ, संशोधनाला विशेष प्रोत्साहन व शिक्षण पद्धतीची आमुलाग्र पुनर्रचना केल्याशिवाय ज्ञानसाधनेच्या अर्थकारणात भारताला तरणोपाय नाही .. .. असे न केल्यास भारत फार मोठी संधी गमावून बसेल.''*

## नवीन आर्थिक धोरण व शिक्षण

शैक्षणिक धोरणाचा व शिक्षण पद्धतीच्या पुनर्रचनेचा विचार करताना नवीन आर्थिक धोरणाच्या अंगभूत त्रिसूत्रीची - उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण ( LPG ) चौकट लक्षात घेणे अपरिहार्य आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे गेल्या दशकात आर्थिक विकासाचा वेग वाढल्याचे सर्वमान्य मत आहे. उदारीकरणाने भूतकालीन परवाना राज्य संपुष्टात येत आहे. वाढत्या स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेमुळे

खाजगी उद्योगधंद्यात नवचैतन्य येऊन आर्थिक विकासात त्यांचे महत्त्व वाढत आहे. जागतिकीकरणामुळे अनेक परकीय उत्पादने भारतीय बाजारपेठेत येऊ लागल्याने स्पर्धेत वाढ होत आहे. प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीला मोठी चालना मिळत आहे. एका अहवालाप्रमाणे परकीय गुंतवणूकदारांच्या मते भारत, चीन आणि अमेरीका हे प्राधान्यप्राप्त देश होत आहेत. स्पर्धेचा परीणाम म्हणून भारतीय उद्योगक्षेत्राची कार्यक्षमता वाढत आहे. स्थूलमानाने ही परिस्थिती आर्थिक प्रगतीला पोषक असल्याने नजिकच्या भविष्यकाळात भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. आजही बेकारी, दारिद्रय, विषमता, निरक्षरता इत्यादी प्रमुख समस्या अस्तित्वात आहेत, तथापि योग्य आर्थिकनीती आणि तिची प्रभावी व प्रामाणिक अंमलबजावणी ह्यांच्या सहाय्याने वरील समस्यांचे समाधानकारक निराकरण नजिकच्या भविष्यकाळात अशक्य नाही. बेकारी, दारीद्रय, विषमता नष्ट होण्यासाठी मनुष्यबळ विकासावर लक्ष केंद्रीत करावे लागते व त्यासाठी शिक्षण व आरोग्य ह्या मूलभूत बाबीत सुधारणा होणे ही प्राथमिक गरज आहे.

शैक्षणिक सुधारणा प्रभावी आणि फलदायी होण्यासाठीच्या त्रिसूत्रीचा अवलंब शिक्षणक्षेत्रात व्हावयास पाहिजे. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतीकीकरण ह्यामुळे उद्योगधंदे व अर्थव्यवसाय ह्यांचा विकास होत असेल तर शैक्षणिक क्षेत्रातही ही त्रिसूत्री फलदायी ठरेल हे सुसंगत तर्कशास्त्र आहे.

परकीय शिक्षणसंस्थाना प्रवेश देऊन आपण शिक्षणाच्या जागतिकीकरणाचा पाया घातला आहे भविष्यात ह्याचा वेग वाढणार आहे.

शिक्षणक्षेत्रात सध्या सर्वात वादाचा विषय हा खाजगीकरणाचा आहे. गेल्या काही काळात शिक्षणाचे बाजारीकरण, राजकीयीकरण, भगवीकरण इत्यादी झाले अशी लेबले प्रत्येकजण आपल्या सोईप्रमाणे लावताना आढळून येतो पण शिक्षणाचे शिक्षणीकरण व्हावे ह्यासाठी काय व्हावयास पाहिजे ह्याबद्दल कोणीही उपाय सुचवताना आढळून येत नाही.

खाजगी शिक्षणसंस्था आणि त्यांचे संचालक ह्याना सर्वांनीच टीकेचे लक्ष्य बनविले आहे. शिक्षणसम्राट, खंडणीबहाद्दर, माफीया इत्यादी अपशब्द वापरुन ह्या संचालकांना बदनाम करण्यात काही तथाकथित विचारवंत आपल्या आयुष्याचे इतिकर्तव्य मानताना आढळून येतात. खाजगी शिक्षणसंस्था म्हणजे समाजाची पिळवणूक करणाऱ्या लूटारुंचा अड्डा आहेत असं अवास्तव चित्र रंगवण्याचा प्रयत्न



काही पोथिनिष्ठ बोलघेवडे सातत्याने करीत आहेत. दुर्दैवाने शिक्षणसंस्थाकडूनही ह्या अपप्रचाराचे प्रभावी खंडन करण्याचे प्रयत्न केले जात नाहीत. परीणामतः खाजगी शिक्षणसंस्था समाजविघातक आहेत असा गैरसमज होण्याची शक्यता आहे. ह्या पार्श्वभूमीवर खाजगी शिक्षण संस्थांची बाजू मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

महाराष्ट्राचे भूतपूर्व मुख्यमंत्री मा.श्री. वसंतदादा पाटील ह्यांनी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय ह्या दोन महत्त्वाच्या व्यावसायिक क्षेत्रात खाजगी शिक्षणसंस्थाना मंजूरी देऊन महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर आयुष्यभराचे उपकार केले आहेत. त्यापूर्वी अशी सोय राज्यात नसल्याने गुणवत्ता असूनही वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षणासाठी राज्यात मर्यादित जागांवर प्रवेश न मिळाल्याने, इतर राज्यात जावे लागत होते. मा. वसंतदादा स्वतः अल्पशिक्षित असूनही भविष्यकालीन शैक्षणिक गरजा ओळखण्याचा द्रष्टेपणा त्यांच्याजवळ असल्याने त्यांनी खाजगी शिक्षण संस्थाना परवानगी देण्याचे धोरण आखून त्याची अमंलबजावणी केली. हे धोरण नवीन खाजगीकरण आणि उदारीकरणाचे धोरण येण्यापूर्वी कितीतरी आधी राबविले गेले. त्यानंतरच्या काळात राज्यात अशा शिक्षणसंस्थांचं प्रभावी जाळं निर्माण झालं.

खाजगीकरणाला विरोध हा बऱ्याच बाबतीत विरोधासाठी विरोध ह्या एकमेव पायावर आधारलेला असतो. ज्या व्यक्ती आणि प्रवृत्ती १९६९ सालच्या बँकांच्या राष्ट्रीयकरणावर टीका करीत होत्या त्याच आज खाजगीकरणाच्या विरोधात उभ्या आहेत म्हणजे ह्यांचा विरोध नेमका कशाला आहे हे त्यांना स्वतःला देखील उमजत नसावे. केवळ विरोध न करता काही ठोस व विधायक स्वरुपाच्या सूचना पुढे आल्यास त्याचा फायदा सर्वांनाच होणार आहे नवीन अर्थनीतीच्या संदर्भात खाजगीकरण हे अपरिहार्य आणि आवश्यक आहे.

खाजगीकरणाच्या विरोधात केल्या जाणाऱ्या युक्तीवादांचे विश्लेषण केल्यास असे आढळून येते की, खाजगीकरणातून निर्माण होणारे लाभ, उदा.वाढती स्पर्धा, वस्तू व सेवांचा उंचावणारा दर्जा, पूर्वी आवाक्याबाहेर असणाऱ्या वस्तूंची उपलब्धता इत्यादी, सर्वांनाच हवे असतात पण खाजगीकरण मात्र, मानसिकता न बदलल्यामुळे, नको असते. कोणतेही लाभ प्राप्त करुन घेण्यासाठी त्याची किंमत मोजणं भागच आहे.

शिक्षण ही जबाबदारी नेमकी कोणाची - सरकारची की समाजाची - हे एकदा निश्चित होणे आवश्यक आहे. भारतासारख्या सव्वाशे कोटी लोकसंख्येच्या खंडप्राय देशात शिक्षणाचा संपूर्ण खर्च सरकारने करावा ही अपेक्षाच अयोग्य आहे. सरकार

कोणत्याही पक्षाचे (अथवा पक्षांचे), किंवा मध्यम, उजव्या, डाव्या कोणत्याही विचारसरणीचे असले तरी संपूर्ण जबाबदारी शासनाला पेलता येणार नाही. वेगवेगळया पक्षांच्या शासनाने वारंवार ही गोष्ट स्पष्ट केलेली आहे की उच्च शिक्षणाची जबाबदारी ही सरकारची नाही. प्राथमिक आणि काही प्रमाणात माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडण्याचा केंद्र आणि विविध राज्यसरकारे यथाशक्ती प्रयत्न करीत आहेत. सर्व शिक्षा अभियान योजनेद्वारे प्राथमिक शिक्षणाकडे (वयोगट ६-१४) सरकारने लक्ष घातले आहे व येत्या ४ ते ५ वर्षात सर्वांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध होईल. केंद्रातील मनुष्य बळ विकास मंत्रालयाने नुकतीच ११ व्या पंचवार्षिक (२००५-०६ ते २०१०-२०११) योजनेंतर्गत ७५ हजार कोटी रुपयांची एक योजना नियोजन आयोगाला सादर केली आहे ( ऑक्टोबर २००५) त्यायोगे माध्यमिक शिक्षणाची व्याप्ती वाढवण्याचा आणि दर्जा सुधारण्याचा हेतू आहे.

उच्च शिक्षणाची जबाबदारी सरकारची नाही हे मान्य केल्यास अर्थातच ही जबाबदारी समाजावर पडते ह्या संदर्भात खाजगी शिक्षणसंस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. खाजगी शिक्षणसंस्था आणि सरकार ह्यांच्यातील संबंधाचा विचार करताना प्रशासन, नियंत्रण आणि आर्थिक भार ह्या मुद्द्यांचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. त्यातही शिक्षणसंस्थांचे व्यावसायिक (अभियांत्रिकी, वैद्यकीय,इ.) आणि व्यावसायिकेतर महाविद्यालये, अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालये असे भिन्न प्रकार लक्षात घ्यावयास हवे. सुप्रीम कोर्टाने ह्याविषयी विविध दाव्यांमध्ये (पै फाऊंडेशन, इस्लामिक ॲकॅडेमी, ब्राम्हो समाज इ.) दिलेल्या निकालांमध्ये ह्या सर्व विषयांच्या बाबतीत मूल्यवान मार्गदर्शन केले आहे ते तपशीलवार जाणून घेणे आवश्यक आहे. विस्तारभयास्तव त्याचा उहापोह ह्या लेखात शक्य नाही. तथापि स्थूलमानाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका, शुल्करचना, प्रवेश प्रक्रिया इत्यादी बाबतीत धोरणाच्या चौकटीत राहून सर्वच शिक्षणसंस्थाना - अल्पसंख्यांक, बहूसंख्यांक, अनुदानित, विनाअनुदानित, व्यावसायिक व व्यावसायिकेतर - योग्य ती स्वायत्तता असणे शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे असा एकूण निकालांचा सूर आढळतो.

खाजगीकरणाच्या विरोधात चावून चोथा झालेला मुद्दा म्हणजे त्यामुळे नफेखोरीला वाव मिळून समाजातील दुर्लक्षित घटकांचे शोषण होते. त्या संस्था भरमसाठ शुल्क आकारुन आणि देणग्याधारीत प्रवेश देऊन गरीब पण गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित करतात. ह्या टीकेचा व्यवहारी दृष्टीकोनातून



विचार न होता केवळ पोथिनिष्ठ अंधानुकरणावर अवलंबून रहाण्याची टीकाकारांची प्रवृत्ती दिसते. बहुसंख्य खाजगी शिक्षणसंस्था ह्या समाज हिताच्या उद्दिष्टाने प्रेरीत होऊन स्थापन केलेल्या असतात अर्थातच आपल्या शिक्षणसंस्थांतून शिकणारे विद्यार्थी हे गुणवत्तावान असावे, संस्थांचा निकाल चांगला लागावा ही त्यांची स्वाभाविक धारणा असते त्यामुळे केवळ देणग्यांच्यामागे लागून ह्या संस्था न्यून गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देतील हे असंभव आहे. नवीन धोरणात स्पर्धा वाढत असताना असं करणं म्हणजे आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखं आहे एवढी जाणीव संस्थाचालकांना निश्चित असते. त्यामुळे गुणवत्तेचा विचार बाजूला सारुन केवळ पैसा कमावण्यासाठी प्रवेश देणाऱ्या संस्था नामशेष होतील व त्यांना गुणवत्ता धारक तर सोडाच, पण कमी गुणवत्ताधारक विद्यार्थीही मिळणार नाहीत. सारांश खाजगीकरणामुळे गुणवत्ता दुर्लक्षित होते हा युक्तीवाद चुकीच्या मानसिकतेवर आधारलेला आहे हे स्पष्ट व्हावे. खरंतर गुणवत्तेवर सरकारी क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्र अधिक भर देते हा सार्वत्रिक अनुभव आहे.

अवाजवी शुल्क आकारणी हा खाजगी संस्थांविरुद्ध केला जाणारा दुसरा आरोपही भ्रामक समजुतीतून निर्माण झालेला आहे. खाजगी संस्थांनी आकारलेले शुल्क जास्त असेल पण म्हणजे ते अवाजवी आहे हे म्हणणे हा सत्याचा विपर्यास आहे. चांगल्या वस्तू स्वस्त नसतात आणि स्वस्त वस्तू चांगल्या नसतात हे त्रिकाल बाधित सत्य आहे. चांगल्या दर्जाचे शिक्षण हवे असेल तर त्याची किंमत मोजण्याची मानसिक तयारी सर्वांनी ठेवावयास हवी. विविध राज्यात फी निश्चिती यंत्रणेमार्फत तसेच न्यायालयीन निर्णयांच्या आधीन राहून योग्य ती शुल्क रचना निश्चित करणे सहज शक्य आहे. शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा आणि इतर गरजा ह्यात दिवसेंदिवस इतकी वाढ आवश्यक आहे की त्यासाठी शुल्कवाढ ही अपरिहार्य ठरते. शुल्क निश्चिती करताना शिक्षणाचा खर्च (Cost of education) हा पाया मानून त्या आधारे शुल्करचना करावयास हवी. ह्यात केवळ शिकवण्याचा खर्च धरुन भागणार नाही तर पुढील विकासासाठी आणि आधुनिक सुविधा पुरवण्यासाठी येणाऱ्या खर्चाचाही अंतर्भाव असावा हे सर्वांना मान्य होण्यासारखे आहे. गुणवान पण गरीब विद्यार्थ्यांना नादारी,शिष्यवृत्ती देऊन त्यांनाही ह्या प्रवाहत सामावून घेता येईल.

खाजगी शिक्षणसंस्थांत नफेखोरी असते हा आरोप करणाऱ्यांनी नफा आणि नफाखोरी ह्यातला भेद समजावून घेणे आवश्यक आहे. नफाखोरी ही अवास्तव, अनैतिक व बेकायदेशीर असते व ती निश्चितपणे पिळवणूकीवरच आधारीत असते ह्या

उलट नफा हा वास्तवता, नैतिकता आणि कायदेशीरपणा ह्या कसोटीवर उतरणारा असून त्याचा समावेश खर्चातच केलेला असतो विविध न्यायालयांनी ह्या संदर्भात वाजवी वाढावा (Reasonable surplus) ह्या संकल्पनेला मान्यता दिलेली आहे.

खाजगी संस्था देणग्या घेतात व समाजाची पिळवणूक करतात असा अपप्रचार कायम केला जातो. हा युक्तीवाद हे केवळ अर्धसत्य आहे, कारण संस्था देणग्या घेतात हे खरं आहे पण त्यासाठी त्या समाजाला वेठीस धरतात अथवा पिळवणूक करतात ह्यात सत्यापेक्षा असत्याचा भाग जास्त आहे. खाजगी शिक्षणसंस्था ह्या धर्मादाय संस्था आहेत व त्यांचा कारभार हा समाजातील दानशूर व्यक्तींनी केलेल्या दानाशिवाय चालूच शकणार नाही. देणग्या गोळा करण्यात अनैतिकता अथवा बेकायदेशीरपणा नाही, कारण अशा संस्थांचे कालबद्ध लेखापरीक्षण सक्षम यंत्रणेकडून केले जाते. अर्थात बेकायदेशीर व बिनहिशोबी देणग्या सक्तीने वसूल करणे अथवा देणगी अभावी प्रवेश नाकारणे हा केवळ कायदेशीर गुन्हा नसून तो नैतिक आणि सामाजिक अपराध आहे व अशा संस्थांवर कडक कारवाई करणं पूर्णपणे समर्थनीय आहे. काही संस्थांमध्ये असे प्रकार होत असतीलही पण म्हणून सगळ्याच शिक्षणसंस्थाना खंडणीबहाद्दर ठरवणे हे अन्यायकारक आहे. खरंतर युवापिढीच्या भवितव्यासाठी ह्या संस्थांना ऐच्छिक मदत देणं हे समाजातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राजकीय पक्षदेखील पक्षाच्या कार्यासाठी व निवडणुकांसाठी असा निधी संकलनाचा कार्यक्रम राबवीत असतातच. ज्या संस्थांच्या कार्यात व निधी संकलनात, काटेकोरपणा, पारदर्शकता, लेखापरीक्षण, नियम आणि कायदे ह्यांचे पालन होते त्यांना समाजद्रोही ठरवणं हा त्यांचाच नव्हे तर संपूर्ण समाजाचा अपमान आहे.

अनुदानित व विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या बाबतीत सध्या शासन आणि विद्यापीठ ह्या दोन्ही यंत्रणांकडून महाविद्यालयांच्या कारभारात अनावश्यक हस्तक्षेप होत असतो. एकूण वृत्ती अशी आहे की नियंत्रणे आमच्या हाती व जबाबदारी तुमच्या माथी. प्रवेश, नेमणूका, शिक्षक मान्यता, अभ्यासक्रम, शुल्क रचना इत्यादी सर्वच बाबतीत नियंत्रणे विद्यापीठ आणि / अथवा शासन ह्यांच्या हाती केंद्रीत झाली आहेत, पण त्याबाबतीत निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देण्याची जबाबदारी मात्र शिक्षणसंस्थांची अशी श्रमविभागणी झालेली आढळते. एकूण हस्तक्षेपाच्या बाबतीत न्यायालयानी असे मत व्यक्त केले आहे की,



*अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवक भरती, प्रवेश ह्या बाबतीत स्वच्छ प्रशासन आणि शिक्षणाची उच्च पातळी राखण्याच्या दृष्टीने आवश्यक अशी नियमावली करण्याचा अधिकार शासनाला असला तरी ह्या संस्था सरकारने शासनाचा एक विभाग (Department) समजून चालवू नये व खाजगी शिक्षणसंस्थांची स्वायत्तता जतन करावी.*

अनुदानित तसेच विनाअनुदानित शिक्षणसंस्थांची शासनाकडून जी ससेहोलपट चालू आहे ती पाहता, अनुदान नको पण दादागिरी (नियंत्रण) आवरा असंच शिक्षणसंस्था चालकाला वाटणे स्वाभाविक आहे. अनुदान दिलं की खाजगी शिक्षणसंस्थांवर मनमानी करायचा आपल्याला अधिकार प्राप्त होतो अशी काही नोकरशहांची कल्पना झालेली अनुभवास येते. शिक्षक भरती हा अत्यंत गंभीरपणे लक्ष देण्याचा विषय असूनही शासन आणि विद्यापीठ त्याबद्दल उदासीन दिसतात. कार्यभारानुसार विषयानुसार आवश्यक त्या शिक्षण संस्थेला तांत्रिक कारणे दाखवून ना हरकत प्रमाणपत्र व मान्यता नाकारण व परीणामी त्यांचे वेतन अनुदानासाठी अग्राह्य धरणं आणि हा भार संस्थांनी सोसावा असे फर्मान काढणे इत्यादी गोष्टी अपवाद नसून नियमच झाल्या आहेत. ह्या बरोबरच तासिका वेतनावर शिक्षकांना राबवून घेतले जात आहे. कित्येक जुन्या तसेच नव्या महाविद्यालयांमध्ये नियमित वेतनश्रेणीवरील व्याख्यात्यांपेक्षा, करारावरील (Contract Basis) आणि तासिका विहीत (CHB) व्याख्यात्यांची संख्या अधिक आहे. अनिश्चिततेमुळे असे व्याख्याते एका ठिकाणी टिकून रहात नाहीत व त्यांना टिकवून धरण्यासाठी संस्थांना पदरमोड करुन त्यांच्या वेतनाचा बोजा सहन करावा लागतो . ह्या पैकी करारावरील व्याख्यात्यांना नियमित वेतन श्रेणीच्या साधारणपणे ५०% व तासिकेवरील व्याख्यात्यांना ३५% वेतन मिळते . समाजवादी विचार सरणीतून खाजगीकरणाला विरोध करणारे ह्या गंभीर विषमतेकडे व त्यात अंगभूत असलेल्या पिळवणूकीकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात. ह्या पद्धतीचा सगळयात गंभीर दुष्परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची होणारी अक्षम्य हानी. तुटपुंजे वेतन मिळणाऱ्या शिक्षकांकडून समर्पितता, संशोधन, एकनिष्ठता इत्यादींची अपेक्षा कशी करता येईल.

शिक्षकदिनाच्या (५ सप्टेंबर २००५) एका समारंभात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. विलासराव देशमुख ह्यांनी शिक्षकी पेशाकडे युवावर्ग आकर्षित होत नाही त्याबद्दल खंत व्यक्त केली होती. नेमणूका आणि वेतन ह्या विषयी सरकारच्या शिक्षण विरोधी धोरणामुळेच ही परिस्थिती निर्माण होऊन गुणवत्तावान, समर्पित, उच्चशिक्षित युवक

आज शिक्षण क्षेत्रापासून दूर जात आहेत हे सत्य संबंधितांना उमजेल तो सुदिन समजावा लागेल.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला आणि आवडीला प्रोत्साहन देणारे अभ्यासक्रम महाविद्यालयांनी सुरु करावयाचे ठरवल्यास विद्यापीठीय लाल फीतीमुळे अमर्याद विलंब होतो. सर्व नवीन अभ्यासक्रम हे कायम विनाअनुदानित तत्त्वावर असूनही कित्येक सेवाभावी शिक्षणसंस्था विद्यार्थिहित आणि समाजाची गरज लक्षात घेऊन, असे अभ्यासक्रम आर्थिक झीज सोसूनही सुरु करावयास तयार असताना विद्यापीठातील अनागोंदीमुळे ह्याला अक्षम्य विलंब लागत आहे.

वानगी दाखल एक उदाहरण पुरेसे आहे. शिक्षणसंस्था तसेच इतर अनेक खाजगी व शासकीय प्रकल्पांमध्ये अर्हताधारक ग्रंथपालांना मोठी मागणी आहे. ह्यासाठी या एमएलआयएस पदवीची गरज असते किमान या शाखेतील मूळ पदवी तरी आवश्यक आहे. १९९७-१९९८ सालापासून मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या दोन महाविद्यालयांनी हा अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्त्वावर चालविण्यासाठी प्रयत्न चालू केले प्रत्यक्षात अनेक प्रयत्नांनंतर त्यापैकी एका महाविद्यालयात २०००-२००१ सालापासूनची मंजुरी मिळाली. ह्या नंतर दोन ते तीन वर्षे हा अभ्यासक्रम सफलतेने राबविल्यानंतर विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे ह्या महाविद्यालयाने एम.लिब.साठी विद्यापीठाकडे अर्ज केला. एम.लिब.साठी विद्यापीठात फक्त १५ जागा असतात व इच्छुकांची संख्या त्या पेक्षा कितीतरी जास्त असते. महाविद्यालयांच्या अर्जांची छाननी करण्यासाठी व अभ्यासक्रमाच्या संलग्नतेसाठी नेमलेल्या स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयाला ५-६ डिसेंबर २००३ रोजी भेट देऊन तपासणी केली. या समितीला आवश्यक ती सर्व माहिती पुरविण्यात आली. आज तीन वर्षे उलटूनही विद्यापीठाकडून होकार अथवा नकार ह्या संबंधी काही कळविण्यात आले नाही. परिणामतः दोन शैक्षणिक वर्षे (२००४-२००५ आणि २००५-२००६) हा अभ्यासक्रम सुरु होऊ शकत नाही. ह्यात विद्यार्थ्यांचे व समाजाचे नुकसान झाले ह्याची जबाबदारी कोणाची? खाजगी शिक्षणसंस्था तयार असूनही आवश्यक ते अभ्यासक्रम चालू करण्यास परवानगी न देणं अथवा विलंब करणे ही विद्यार्थ्यांची पिळवणूक नव्हे काय?

खाजगी शिक्षण संस्थांवर टीकेचा आसूड ओढण्यापूर्वी काही वस्तूस्थिती लक्षात घ्यावयास पाहिजे. गेल्या काही वर्षात सरकारने व्यावसायिक (अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधशास्त्र, वास्तूशास्त्र इ.) तसेच व्यावसायिकेतर (कला, वाणिज्य,विज्ञान, विधी,



शिक्षणशास्त्र इ.) अशा स्वतःच्या संस्था किंवा महाविद्यालये किती चालू केली किंवा किती संस्थांना अनुदान मंजूर केले ह्याचा शोध घेतला तर ही संख्या नगण्य असेल ह्या उलट ह्याच प्रकारच्या खाजगी विनाअनुदानित संस्थांची संख्या दिवसेंदिवस वाढताना आढळते आहे.ह्याचा अर्थ वाढती मागणी पुरवण्यासाठी खाजगी शिक्षणसंस्थांशिवाय दुसरा पर्याय नाही.

वर उल्लेख केल्याप्रमाणे खाजगी शिक्षणसंस्थांना लुटारु, खंडणीबहाद्दर, माफिया, इत्यादी ठरवण्यापूर्वी भोवतालच्या परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. समाजात शिक्षण संस्था हा एक प्रमुख घटक असला तरी तो एकमेव घटक नाही. ह्यात डॉक्टर्स, कर सल्लागार, कलाकार, वास्तुविशारद, दुकानदार, विक्रेते, विकासक, बिल्डर्स, खाजगी कोचिंग वर्ग संचालक, खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी इत्यादी विविध क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश हेतो. दुर्दैवाने समाजातील ह्या प्रत्येक घटकात दुष्प्रवृत्ती कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात आहेत. काही डॉक्टर रुग्णांना लुबाडताना, भिती घालून त्यांच्याकडून भरमसाट पैसा उपटतात, अनावश्यक अशा चाचण्यांच्या रॅकेटमधे त्यांना गुंतवतात, स्वयंघोषित समाजसेवक आणि काही राजकारणी कामाच्या नावाखाली समाजाला नागवतात, मंत्री, संत्री, कुलगुरु, प्राध्यापक, सनदी अधिकारी, आयकर, उत्पादनशुल्क, विक्रीकर, परीवहन, वीज, टेलिफोन, जकात खाते इत्यादी सर्वच क्षेत्रातील कर्मचारी व अधिकारी गैरव्यवहरात अडकलेले आढळतात. एकूणच समाजाची नीतीमत्ता इतक्या नीचतम पातळीला पोचली आहे की सर्वांचीच मान शरमेने खाली जावी. ह्या एकूण परिस्थितीचा परीणाम शिक्षणक्षेत्रावर होणं अपरीहकर्य नाही का?ह्या परिस्थितीला सरकार आणि त्यांची अजूनही अस्तित्वात असलेली परवाना, मान्यता, मंजुरी पद्धती मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. अजूनही अवैध पैसा दिल्याशिवाय मंजूरी अथवा मान्यता, कित्येक प्रकल्पांना, ज्यात शैक्षणिक प्रकल्पांचाही अंतर्भाव आहे, प्राप्त होत नाही ह्या सत्यस्थितीकडे आपण किती काळ डोळेझाक करणार आहेत? शिक्षणसंस्थात अपप्रकार घडत नाहीत असे नाही. ह्याचे समर्थन अजिबात केले जाऊ नये व असे प्रकार समाज हिताच्या दृष्टीकोनातून निपटले जावयास हवेत ह्या विषयी दुमत असण्याचे कारण नाही. पण त्यासाठी संपूर्ण समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

खाजगी शिक्षणसंस्था वारेमाप पैसा उकळतात ह्यात काही तथ्यांश असला तरी त्या संस्था त्याबदल्यात व्यावसायिक शिक्षणाच्या अत्याधुनिक सोयी उपलब्ध करतात

हे नाकरता येणार नाही ह्या संस्थांतून केवळ धनिकच नव्हे तर अनेक मध्यमवर्गीय व गरीबांनाही गुणवत्तेनुसार शिक्षणाची दालने उघडली आहेत. सध्या धर्माचे जे व्यापारीकरण चालू आहे त्या तुलनेत शिक्षणसंस्थातील बाजारीकरण काहीच नाही असे म्हणावे लागेल. गणेशोत्सव नवरात्र, गरबा, दांडीया ह्यावर समाजाचा इतका पैसा उधळला जातो आहे, की त्याचा योग्य विनियोग झाल्यास अनेक समाज हितकारी प्रकल्प उभे रहतील. गणेशोत्सव आणि नवरात्री ह्यातून किती प्रमाणात धार्मिक भावनांना प्रोत्साहन मिळते किंवा धार्मिक उन्नती होते ह्याचे उत्तर सर्वांनाच माहित आहे. खरंतर ह्यापैकी अनेक ठिकाणी ज्या भयानक चंगळवादाचे आणि गलीच्छपणाचे सार्वजनिक प्रदर्शन घडते त्यामुळे गणपती आणि दुर्गामाता ह्या दोन्ही देवतांची मान लाजेने खाली जात असेल.

खाजगीकरणाने जादूची काडी फिरवल्याप्रमाणे सर्व परिस्थिती आदर्श हेईल असा दावा नाही. पण परिस्थितीत योग्य तो बदल निश्चित होऊ शकेल. खाजगीकरणाने स्पर्धा वाढीस लागून त्यामुळे अकार्यक्षम आणि समाजाची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या संस्था आपोआप निपटल्या जातील व शिक्षणक्षेत्राला उर्जितावस्था व सक्षमता प्राप्त हेईल.

सध्या वैद्यकीय व अभियांत्रिकी महविद्यालयामध्ये अनेक जागा मागणी अभावी रिक्त आहेत. त्यामुळे भरमसाठ देणग्या आणि शुल्क आकारणाऱ्या आणि दर्जेदार शैक्षणिक सुविधा न पुरवणाऱ्या संस्था स्पर्धेतून आपोआप बाद होतील. परिणामतः खाजगी संस्थांच्या कारभारात पारदर्शकता, सचोटी इत्यादींचा अनुभव येईल. ह्यासाठी फार वाटही पहावी लागणार नाही.

खाजगीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांपेक्षा त्यातून प्राप्त होणारे लाभ हे निश्चित स्वरुपाचे चिरंतर आहेत ह्यात :

- नविन धोरणांतर्गत देशात प्रवेश करणाऱ्या परकीय शिक्षण संस्थांशी/विद्यापीठाशी स्पर्धा करण्याची क्षमता.
- विद्यार्थ्यांच्या कुवतीनुसार व समाजाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमांची उपलब्धता.
- दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता.



- गुणवत्तेला योग्य वाव.
- स्थलकाल पद्धतीनुसार अभ्यासक्रमाची रचना.
- अनुभवी, तज्ज्ञ, गुणवत्ता धारक शिक्षकांचा सहभाग.
- आवश्यक त्या आधुनिक शैक्षणिक सोयींची उपलब्धता.
- दर्जेदार पायाभूत सुविधा.
- संशोधनाला वाव.
- अकार्यक्षम व नफेखोर संस्था नामशेष

इत्यादींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

खाजगीकरणाकडे डोळस दृष्टीकोनातून पाहिल्यास त्याची आवश्यकता लक्षात येईल. पश्चिम बंगाल सारख्या साम्यवादी विचारसरणीच्या राज्याचे मुख्यमंत्री मा. बुद्धदेव भट्टाचार्य ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, ''कोणत्याही विचाराकडे पहातांना तत्त्वापेक्षा वास्तवतेला अधिक महत्त्व द्यावयास हवे.''

नवीन धोरणाच्या संदर्भात शिक्षणाचे खाजगीकरण ही वास्तवता स्विकारली तर त्यातील दोष दूर करुन शिक्षण समाजाभिमुख कसे होईल. ह्याकडे संबंधितांनी लक्ष केंद्रीत करावयास हवे. ह्यातूनच सर्वांना अपेक्षित भारतीय महासत्तेची मुहुर्तमेढ रोवता येईल. म्हणूनच शिक्षणाचे खाजगीकरण : काळाची गरजे

❑ ❑ ❑